पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १५४ ■ गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 ■ Email: citynewss80@gmail.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा!
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा

## केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना मोठा धक्का !

वृत्तसंस्था ११ डिसेंबर

**नवी दिल्ली :** पगार वाढीचा विषय नेहमीच नोकरदारांच्या जिव्हाळ्याचा असतो. पुढील महिन्यात, जानेवारीमध्ये, केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांना महागाई भत्ता आणि महागाई सवलतीबद्दल केंद्र सरकारकडून निराशाजनक माहिती मिळू शकते. नवीन वर्षात केंद्र सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांना मोठी पगारवाढ मिळण्याची शक्यता कमी आहे. फायनान्शिअल एक्सप्रेसच्या माहितीनुसार १ जानेवारी २०२६ पासून डीए आणि डीआरमध्ये फक्त २टक्के वाढ होण्याची अपेक्षा आहे, जी गेल्या सात वर्षातील सर्वात कमी असू शकते. जानेवारी २०१९ पासून फक्त एकदाच डीएमध्ये फक्त २टक्के वाढ, जानेवारी २०२५ मध्ये करण्यात आली. इतर बहुतेक वाढ ३टक्के किंवा त्याहून अधिक राहिली आहे.

## महाराष्ट्र आणि गुजरात सीमेवरील वाद पुन्हा समोर

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**मुंबई :** महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांच्या सीमेवरील वाद वाढण्याची शक्यता आहे. पालघर जिल्ह्यातील तलासरी तालुक्यात वेवजी गावात गुजरातची घुसखोरी सुरू असल्याचा दावा गावकऱ्यांनी केला आहे. मागील २५-३० वर्षापासून याठिकाणी सीमावाद असून वेवजी ग्रामस्थांनी केलेल्या आरोपामुळे महाराष्ट्र गुजरात सीमावाद पुन्हा उफाळून आला आहे. महाराष्ट्र राज्यातील तलासरी तालुक्यातील वेवजी व गुजरात राज्यातील उंबरगाव तालुक्यातील सोलसुंबा येथील हद्दीच्या भागात अतिक्रमण वाढून महाराष्ट्र व गुजरात राज्यात वादाचे प्रसंग वारंवार उद्भवत आहेत.

# शेतकऱ्यांची सरसकट लूट सुरु

♦ कुठल्या खरेदी केंद्रावर सोयाबीन ५३०० रुपयांनी खरेदी केला आम्हाला दाखवा

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**नागपूर :** सोयाबीनमध्ये सरसकट लूट सुरु आहे. मोठ्या प्रमाणात उद्योगपती भरभरून सोयाबीन भारतात आणत आहेत. जर आता सोयाबीन खरेदी झाला नाही तर महिन्यात सोयाबीन हजारावर येईल लिहून ठेवा, असा इशारा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिला. वडेट्टीवार यांनी हमीभावाचा मुद्दा उपस्थित करत कोणत्या खरेदी केंद्रावर सोयाबीन ५३०० रुपयांनी खरेदी केलाय आम्हाला दाखवून द्या, असे आव्हान त्यांनी सरकारला दिले.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, यावर्षी अतिवृष्टीमुळे सोयाबीन पूर्णतः अनेक ठिकाणी खराब झाला. काही ठिकाणी सोयाबीनची क्वालिटी खराब झाली. त्यांनी सभागृहात सांगितले की, ७० टक्के सोयाबीन परत केला जात आहे. म्हणून सरसकट सोयाबीन हमी भावान खरेदी होण्यासाठी सरकार काय उपाययोजना करणार आहे अशी विचारण त्यांनी केली. त्यांनी आयातीवर लावलेल्या कराबद्दलही प्रश्न विचारला. ते म्हणाले की, आयातीवर शून्य टक्के आयात कर केला आहे. १२ टक्क्यावरून तो कमी करण्यासाठी राज्य सरकार काय प्रयत्न करणार? अशीही विचारणा त्यांनी केली.

परंतु, ग्रेडिंगच्या नावाखाली मोठा गैरप्रकार सुरू असल्याचे आमच्या निदर्शनास आले. खरेदी केंद्रावरील ग्रेडर माल पास करत असला, तरी गोडाऊनवर नाफेडचा ग्रेडर तोच माल नाकारत होता. दोन ट्रक नाकारले की खरेदी-विक्री संघांची आर्थिक परिस्थिती एवढी बेताची असते की १५-२० लाखांचा माल खरेदी करून ठेवण्याची त्यांची क्षमता नसते. यावर उपाय म्हणून नाफेडला सुचवले की खरेदी केंद्रावर आणि गोडाऊनवर दोन्ही ठिकाणी नाफेडचेच ग्रेडर नेमावेत. तरीही अडचणी सुरूच राहिल्या. मी स्वतः खरेदी केंद्रावर गेलो, ते म्हणाले.

### सोयाबीन खरेदीत अधिकाऱ्यांचा नाकर्तेपणा

◆ दरम्यान, सोयाबीन खरेदीवरून भाजप आमदार रणधीर सावरकर यांनी सरकारला घरचा आहेर दिला. त्यांनी विदर्भात कापूस खरेदीची सुद्धा परिस्थिती बिकट असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, सीसीआय नाममात्र खरेदी करत आहे. कृषी खात्याने काहीही केलेलं नाही. सोयाबीन खरेदीत अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणा असल्याचा हल्लाबोल त्यांनी केला. ते पुढे म्हणाले की, सरकारला नाफेडमार्फत सोयाबीन खरेदी लवकर सुरू करण्याची विनंती करण्यात आली होती. यासंदर्भात नाफेडची एक महत्त्वाची बैठकही झाली आणि मी स्वतः त्या बैठकीत उपस्थित होतो. सोयाबीन खरेदी प्रक्रियेत दोन स्तरांवर ग्रेडर असतो. एक खरेदी केंद्रावर आणि दुसरा गोडाऊनवर.

तिथे सोयाबीनचा ओलावा १२ टक्के निघाला; पण फक्त तीन तासांनी गोडाऊनवर तोच ओलावा १३ टक्के दाखवला. एवढ्या कमी वेळात ओलाव्यात १ टक्क्यांची वाढ कशी होऊ शकते? खोलात चौकशी केली असता लक्षात आले की खरेदी केंद्रावर आणि गोडाऊनवर वेगवेगळे ओलावा मोजणारे मीटर वापरले जात होते. अशा पद्धतीने शेतकऱ्यांची फसवणूक करत खरेदीची प्रक्रिया राबवली जात होती.

## देवेंद्र फडणवीस पंतप्रधान मोदींचे उत्तराधिकारी होणार?

### दिल्लीला जाण्याच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांचे उत्तर



वृत्तसंस्था ११ डिसेंबर

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केली आहे. वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर राजकारणातून निवृत्ती घेण्यासंदर्भात मोदी यांनी आदेशही काढला होता. त्यामुळे आता मोदींच्या उत्तराधिकाऱ्याबाबत चर्चा होऊ लागली आहे. मोदींचे उत्तराधिकारी म्हणून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नावाचा उल्लेख सातत्याने केला जातो. या सगळ्यावर फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते मुंबई तकच्या 'अन्स्टॉपेबल महाराष्ट्र' या कार्यक्रमात बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'बाप जीवंत असताना उत्तराधिकारी शोधणारी आपली संस्कृती नाही. ही मुघलांची संस्कृती आहे. मुघल असं वागायचे. आपण तसं काही करत नाही. तसेच आत्ता पंतप्रधान मोदी यांचा उत्तराधिकारी शोधण्याचं काहीच कारण नाही. ते आत्ता देशाचं अतिशय चांगल्या पद्धतीने नेतृत्व करत आहेत. त्यांच्यामुळे जागतिक पातळीवर भारताची मोठी प्रतिमा तयार झाली आहे. पूर्वी भारत म्हणजे 'किस झाड की पत्ती?' अशी आपली स्थिती होती. मात्र, आत जग आपल्याकडे आशेने पाहतंय.

### सध्या मोदींचा उत्तराधिकारी शोधण्याची आवश्यकता नाही : मुख्यममंत्री

◆ 'आपल्याकडे इतका चांगला नेता असताना, इतकं कणखर नेतृत्व असताना आपल्याला सध्या त्यांच्या उत्तराधिकाऱ्याचा विचार करण्याची आवश्यकता नाही. त्याचबरोबर मोदी हे शारीरिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या एकदम तंदुरुस्त आहेत. मोदी असे तंदुरुस्त असेपर्यंत इतरांचा विचार करायची गरज नाही. त्यामुळे २०२९ ला देखील मोदी हेच भारताचे पंतप्रधान होतील.'

## ई-सिगारेटवरून संसदेत गोंधळ !

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**नवीदिल्ली :** भाजप खासदार अनुराग ठाकूर यांनी सभागृहात ई-सिगारेट ओढण्याचा गंभीर मुद्दा उपस्थित केल्याने लोकसभेचे हिवाळी अधिवेशन गदारोळात गेले. त्यांनी कोणत्याही खासदाराचे नाव घेतले नाही, परंतु या मुद्द्याचा संबंध तृणमूल काँग्रेसच्या खासदाराशी असल्याचे स्पष्ट झाले. संसदीय कामकाजादरम्यान अशा प्रकारच्या कृती केवळ नियमांच्या विरुद्ध नसून सभागृहाच्या शिष्टाचारालाही धक्का पोहोचवतात, असे अनुराग ठाकूर यांनी सांगितले. अनुराग ठाकूर यांनी याप्रकरणी बोलताना, 'सभागृह हे असे ठिकाण आहे जिथे देशभरातील लाखो लोक आशेने पाहतात. त्यामुळे संसदीय शिस्तीचे उल्लंघन करणारे कोणतेही वर्तन येथे खपवून घेतले जाऊ नये.

## भाजप अकोला महापालिका स्वतंत्र लढण्याचे संकेत !

प्रतिनिधी ११ डिसेंबर

♦ महायुतीचा ७ महापालिकांसाठी फॉर्म्युला ठरला ?

**अकोला :** आता महापालिका निवडणुकांचे वेध सर्वांना लागलेले आहेत. २१ डिसेंबर रोजी नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचा निकाल जाहीर होणार असून, त्यानंतर किंवा त्या पुर्वी महापालिका निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता असल्याने राजकीय पक्षाने आता आघाडी घेतल्याचे पाहायला मिळत आहे. महायुतीमध्ये असलेल्या भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून मोर्चेबांधणी सुरू असून, उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. अशातच आता महायुतीने राज्यातील सात महापालिकांसाठी नवा फॉर्म्युला ठरला असल्याची चर्चा आहे.पण, अकोला महापालिकेत गेल्या वेळी सर्वाधिक जागा जिंकणारी भाजपा यंदा एकला चलो रे चा नारा देऊ शकते. त्यामुळे शिंदे सेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस याची भूमिका पाहण्यासारखी असेल.

मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक आणि नागपूर या ५ महापालिका निवडणुका भाजप-शिवसेना एकत्रित लढणार असून, पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी आणि भाजप वेगवेगळे निवडणुकीच्या मैदानात असणार आहेत, असा महायुतीचा फॉर्म्युला या महापालिकांसाठी झाला असल्याची माहिती समोर आली आहे.पुणे, पिंपरी चिंचवड महापालिकेवर २०१७ साली झालेल्या निवडणुकीत भाजपची सत्ता होती. मात्र, आता राज्यात महायुती सरकार असल्याने समीकरणे पूर्णपणे बदलली असून, भाजप आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांची ताकद येथे समसमान आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना संधी मिळावी आणि बंडखोरी होऊ नये यासाठी भाजप आणि राष्ट्रवादी पक्षाने अशी रणनिती आखल्याचे बोलले जाते आहे. याउलट नागपुरात भाजपची ताकद अधिक असली तरी तिथे शिवसेनेला देखील सोबत घेतले जाणार आहे. मुंबईत हेच समीकरण पाहायला मिळणार असून, नवी मुंबईत संदर्भात अद्याप निर्णय झालेला नाही. महापालिका निवडणुकीसाठी उमेदवार आणि रणनीतीचा भाजपकडून नवा पॅटर्न अंमलात आणाला जाणार असून, नगरपरिषद निवडणुकांमध्ये प्रभारींनी उमेदवारापासून ते रणनीती निश्चितीपर्यंत मनमानी केल्याचे समोर आले होते, याला चपराक घालण्यासाठी खलबंत सुरू झाली आहेत. भाजपाच्या दृष्टीने निवडून येण्याची खात्री असलेल्या प्रभागात तरुण एकनिष्ठ असलेल्या उमेदवारांना संधी दिली जाणार आहे.

## उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंना भ्यायचं कारण नाही

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**मुंबई :** मी काय किंवा माझे बंधू आम्ही संघ विचारांचे आहोत हे कधीही लपून राहिलेलं नाही. शाखेत जायला वडिलांचा विरोध कधी जुमानला नाही तर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंना भ्यायचं काय कारण आहे? असं मनसेचे माजी नेते प्रकाश महाजन यांनी म्हटलं आहे.



देवेंद्र फडणवीसांच्या भेटीसाठी प्रकाश महाजन नागपूरमध्ये दाखल झाले आहेत. त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला तेव्हा हे विधान केलं आहे. प्रकाश महाजन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या भेटीबाबत विचारण्यात आले. यावर माझं वैयक्तिक काम आहे. मुख्यमंत्र्यांसोबत पारिवारिक संबंध आहे, असं प्रकाश महाजन म्हणाले. यावेळी प्रकाश महाजन यांनी वैभव खेडेकर यांचंही कौतुक केलं. भाजपामध्ये वैभव खेडेकर खूप आनंदी आहे. माझ्या पाल्याचा आनंद पाहायला आलो आहे. वैभव खेडेकर कमळाकडे गेला. त्यामुळे मी खूश आहे, असं प्रकाश महाजन म्हणाले.

## एक्सप्रेस वेवर भीषण अपघात, पाच जणांचा कोळसा

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**लखनौ:** उत्तर प्रदेशातील बाराबंकी येथील पूर्वांचल एक्सप्रेस वेवर एक भीषण अपघात झाला. या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. या भयानक अपघातात पोलीस कॉन्स्टेबल जावेद यांचे संपूर्ण कुटुंब संपलं आहे. एका भरधाव वेगाने येणाऱ्या ब्रेझा कारने त्यांच्या वॅगन आर कारला मागून धडक दिली, ज्यामुळे कारच सीएनजी टँक फुटली आणि भीषण आग लागली. या भीषण अपघातात दोन महिला आणि तीन मुलांसह पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. बुधवारी संध्याकाळी बाराबंकी येथील पूर्वांचल एक्सप्रेसवेवर एक भीषण रस्ते अपघात झाला.

## सराफा बाजारात मोठी उलटफेर

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**मुंबई :** फेडरल रिझर्व्हने दर कपात केल्यानंतर भारतातील सराफा बाजारात मोठा उलटफेर झाला आहे. सोने आणि चांदीच्या दरांनी जोरदार उसळी घेतली असून यामुळे एकीकडे गुंतवणूक करणाऱ्यांची चांदी झाली तर खरेदी करणाऱ्यांच्या खिशाला मोठी झळ बसली आहे. ११ डिसेंबर रोजी सकाळी एमसीएक्सवर सौद्यांमध्ये सोन्याच्या किमती अर्ध्या टक्क्याने वाढल्या तर चांदीने नवीन विक्रमी उच्चांक गाठला. यूएस फेडरल रिझर्व्हने दरात २५ बेसिस पॉइंट्सची कपात केली आणि पुढील वर्षी आणखी एक दर कपात करण्याचे संकेत दिल्याने सराफा बाजारात खळबळ उडाली.


## अमरावती राजकमल पुलाचा मुद्दा विधानसभेत गाजला

### आमदार रवी राणा यांची लक्षवेधी

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अमरावती:** रेल्वे स्टेशन कडून राजकमल कडे जाणारा ऐतिहासिक पूल हा जुना व शिकस्त झाल्यामुळे त्या जागी नवीन पुलाची निर्मिती करणे गरजेचे आहे.राजकमल चौक हा शहरातील मुख्य चौक असून या ठिकाणची वाहतूक आणि रहदारी मोठ्या प्रमाणात असल्याने हापूल तातडीने उंच करणे आवश्यक आहे. सध्या महानगरपालिका प्रशासनाने या पुलावरून रहदारी बंद करण्यात आली आहे.

ही रहदारी जस्तम चौक मार्गे वळवण्यात आली आहे. ५० कोटी रुपयांचे निधीतून हा पुलाची उभारणी



होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १७ कोटींचा निधी दिला आहे. या पुलाच्या कामाकरिता उर्वरित निधी देण्यात यावा अशी मागणी बडनेरा चे आमदार रवी राणा यांनी विधानसभा अध्यक्षांकडे केली आहे. तसेच त्यांनी पुरणी मागण्या व लक्षवेधी दरम्यान अमरावती महानगरपालिकेच्या नवीन नवीन इमारतीचा प्रस्तावही ठेवला आहे. या ठिकाणी महानगरपालिकेची इमारत जुनी असून वेगवेगळ्या विभागात वेगवेगळ्या विभागाचा कारभार सुरू आहे. या ठिकाणी जागा अत्यंत कमी असल्याने नागरिकांनाही त्रास होतो. त्या अनुषंगाने या ठिकाणी नवीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे. त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी ही आमदार रवी राणा यांनी केली आहे. शहराच्या विकासाच्या दृष्टिकोनातून नवीन डीपी प्लॅन तयार करून तो मंजुरी करता पाठवलेला आहे. त्याला तातडीने मंजुरात देऊन शहराचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने निर्णय घेण्यात यावा अशी मागणी ही आमदार रवी राणा यांनी यादरम्यान केली आहे. तसेच बडनेरा व अमरावती शहराच्या विकासाच्या दृष्टिकोनातून अनेक प्रश्न आमदार रवी राणा यांनी विधानसभा अध्यक्षांकडे म्हणून शासनाचे लक्ष वेधले.

### अकोली मार्गावरील म्हाडाच्या लाभार्थ्यांचा व्याजमापी करण्यात यावी

◆ अकोली मार्गावर २००२ मध्ये म्हाडाच्यावतीने प्रत्येकी दोन लाख रुपये प्रमाणे लाभार्थ्यांना घरकुल देण्यात आले होते. साडेसहाशे ते सातशे परिवार या ठिकाणी राहतात. परंतु दोन लाख रुपयावर दोन लाख रुपये व्याज त्याच्यावरही चक्रकार दंड लावण्यात येत असल्याने ते भरू शकत नाहीत. त्यामुळे भविष्यात आपले घरकुल शासन ताब्यात घेईल की काय? अशी चिंता येथील नागरिकांना राहते. त्यामुळे त्यांच्या घरकुलावरील व्याज व त्यावर आकारण्यात आलेला दंड शासनाने माफ करावा यासंदर्भात लक्षवेधी आमदार रवी राणा यांनी मांडली. तसेच या ठिकाणी आणखीन २० एकर जागा आहे. त्या ठिकाणी पंतप्रधान आवास योजनेतून दोन ते अडीच हजार गरीब लाभार्थ्यांना घरकुल देता येईल प्रस्ताव पाठवण्यात येईल त्याला मंजुरात देण्यात यावी अशी मागणीही आमदार रवी राणा यांनी केली. आमदार रवी राणा यांनी अनेक महत्त्वाचे प्रश्न विधानसभा अध्यक्षांकडे मांडले. व यावर शासनाचे लक्ष वेधले.




## अतिवृष्टीमुळे रस्ते, पूल बिघडले ; अधिवेशनात प्रश्न उपस्थित करणार– आ. किसनराव वानखडे

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**यवतमाळ :** यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे उमरखेड-महागाव विधानसभा क्षेत्रातील अनेक रस्ते, पूल मोठ्या प्रमाणावर खराब झाले आहेत. या रस्त्यांमुळे नागरिकांना वाहतूक अडथळे व दैनंदिन जीवनात अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच पूलांचे नुकसान झाल्यामुळे गावकऱ्यांना वाहतुकीसाठी पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत असून अनेक ठिकाणी जीवितहानीचा धोका निर्माण झाला आहे. याबाबत आमदार किसनराव वानखडे यांनी ठळक मत व्यक्त केले आहे. ते आगामी हिवाळी अधिवेशनात या रस्त्यांवरील दुरुस्ती, पूलांची उंची वाढवणे व आवश्यकतांच्या अनुषंगाने पूलांचा विस्तार याबाबत प्रश्न उपस्थित करणार आहेत.



उमरखेड, महागाव तालुक्यातील रस्त्यांची अर्धवट स्थिती, पूलांचे धोकादायक स्वरूप आणि अपुरी देखभाल या समस्यांमुळे सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. आमदार वानखडे यांनी याबाबतच्या सरकारी यंत्रणांकडून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी अधिवेशनात या प्रश्नांवर सखोल चर्चा करावी, निधी मंजूर करून रस्ते व पूल दुरुस्त करावेत, तसेच या समस्येच्या दीर्घकालीन उपाययोजना लागू कराव्यात, असेही स्पष्ट केले. उमरखेड विधानसभा मतदार संघातील नागरिक, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे प्रतिनिधींनी देखील रस्ते, पूलांच्या खराब स्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. शेतकरी, विद्यार्थी व दररोजच्या कामासाठी रस्त्यांवर अवलंबून असलेले नागरिक या समस्येचा मोठ्या प्रमाणावर अनुभव घेत आहेत. हिवाळ्याच्या अधिवेशनात हा विषय उठवून आमदार वानखडे मतदार संघातील वाहतूक, सुरक्षिततेसंदर्भातील समस्यांवर सरकारचे लक्ष वेधणार आहे.



# दर्यापूर आकोट मार्गावर अपघात, दोन जण गंभीर

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**दर्यापूर :** दर्यापूर ते आकोट मार्गावर सांगून फाट्यावर आज रात्री साडेआठ वाजताच्या दरम्यान दर्यापूर वरून आकोट कडे मोटरसायकल घेऊन जात असलेल्या दोन जणांना आयशर ट्रकने धडक देऊन गंभीर जखमी केल्याची घटना घडली सविस्तर माहिती नुसार आकोट येथील रहिवासी रोशन जावरकर वय ३२ वर्ष हे दर्यापूर वरून अकोला जात असताना सांगळुद जवळ गयाठी नाल्या वर अमरावती येथून येत असलेल्या आयशर ट्रकने धडक देऊन मोटरसायकल सरांना उडविले या अपघाताची माहिती मिळताच शिवसेना मदत कक्ष मदतीला राहुल भुंबर यांनी तात्काळ दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले मात्र गंभीररित्या जखमी असलेल्या दोघांना अमरावती येथे हलविण्यात आल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात जिल्हा विदर्भात अव्वल

## युवकांनी लाभ घेण्याचे जिल्हा उद्योग केंद्राचे आवाहन

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अमरावती :** राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' योजनेच्या अंमलबजावणीमध्ये जिल्ह्याने विदर्भात प्रथम क्रमांक, तर राज्यात सहावे स्थान पटकावले आहे. जिल्ह्याला आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता १ हजार ६०० कर्ज प्रकरणे मंजूर करण्याचे लक्ष्यांक असताना, नोव्हेंबर २०२५ अखेरपर्यंत जिल्हा प्रशासनाकडून बँकांना एकूण २ हजार ४८० कर्जप्रकरणे पाठवण्यात आली आहेत. यापैकी ५११ प्रकरणांना बँकांकडून मंजुरी मिळाली आहे.

राज्यातील युवक-युवतींच्या सर्जनशीलतेला वाव देऊन स्वयंरोजगारास प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. वाढत्या बेरोजगारीवर उपाय म्हणून युवकांना नोकरी शोधण्याऐवजी स्वतःचा व्यवसाय उभारण्यास प्रोत्साहन देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. पात्र लाभार्थ्यांना प्रवर्गनिहाय एकूण प्रकल्प खर्चाच्या १५ ते ३५ टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाते. या योजनेत उत्पादन करणाऱ्या उद्योगांसाठी १ कोटी रुपयांपर्यंत कर्ज मिळू शकते, तर अनुदानाची कमाल मर्यादा १७.५० लाख रुपये आहे. सेवा उद्योगांसाठी ५० लाख रुपयांपर्यंत कर्ज असून अनुदानाची मर्यादा ७ लाख रुपयांपर्यंत आहे. ग्रामीण भागात व्यवसाय उभारल्यास शहरी भागापेक्षा १० टक्के अधिक अनुदान मिळते. तसेच, मागास प्रवर्ग, महिला, दिव्यांग, माजी सैनिक आणि अल्पसंख्यांक यांना अतिरिक्त अनुदानाची तरतूद आहे. अर्ज करण्यासाठी १८ वर्षे वय असणे आवश्यक असून वयाची कमाल मर्यादा नाही. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून अधिकृत पोर्टलवर अर्ज भरता येतो. या योजनेची अंमलबजावणी जिल्हा उद्योग केंद्र आणि खादी ग्रामोद्योग मंडळ यांचेमार्फत केली जाते. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनामुळे जिल्ह्यात या योजनेला गती मिळाली आहे. दर महिन्याला सर्व बँकर्स, जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक व यंत्रणांची सभा घेऊन योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेत आहेत. जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक नरेश हेडाऊ यांच्याकडून बँकांना उद्दिष्टपूर्तीसाठी सूचना देण्यात येत आहेत. या योजनेत आतापर्यंत राष्ट्रीयकृत बँकांकडूनच कर्ज प्रस्तावाना मंजुरी मिळाली आहे. खासगी बँकांकडून कर्ज प्रस्तावांना मंजुरी देऊन त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांनी खासगी बँकांवर कारवाई करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हा अग्रणी बँक प्रबंधकांना दिले आहेत. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निलेश निकम यांच्या नियोजनात जिल्हास्तरावर योजनेची माहिती देण्यासाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जात आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील युवकांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# उच्च न्यायालयाने केला गुन्हा खारीज

## ♦ ॲड. सपना जाधवांची सफल पैरवी

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अमरावती :** महिलेस रस्ता अडवून अश्लील शिविगाल करुन आलिंगन घालूँन छेड़खानी केल्याचे आरोप व अनुसूचित जाति व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत दखल असलेला गुन्हा उच्च न्यायालय यानी केला खारिज

एड राहुल शिंदे व एड सपना जाधव यांचे सफल पैरवी केली.

यवतमाल जिल्हा अंतर्गत येनारे अवधूत वाड़ी पुलिस स्टेशन येथे दी २६/३/२०२१ रोज़ी कलम ३५४, ३५४(अ), ३४१, २९४, भा दं वी व कलम ३(१)( )(ग) अनुसूचित जाति अनि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा क्र ०२९६/२०२१ तक्रारकर्ती हिच्या आरोपी विरुद्ध तक्रार की त्यांच्यी तक्रारकर्ती वर पहिले पासूंन वाइट नजर आहे याबाबत तीने तिच्या पति व फ्लैट मलक याना कळविले होते तेंव्हा त्यांनी तीन ते चार वेळा आरोपिस समजाऊँन संगीतले होते दी २५/३/२०२१ रोज़ी सायंकाळी तक्रारकर्ती मार्केट मधुन त्यांच्या अपार्टमेंट समोर आली अस्ता आरोपीणे दोन्ही हाताने रास्ता अड़वुँन तिला अश्लील शिवीगाळ केली व फ्लैट चे खाली पार्किंग मधे वाइट उद्देशाने आलिंगन दिले त्यामुळे तिला लज्जा वाटली अशी तक्रार दाखल करण्यात आले होते. सदर तक्रार मधे अवधूत वाड़ी पुलिस स्टेशन ने तपास पूर्ण करुण चार्ज शीट दखल करुण प्रकरण न्याय प्रविष्ट केले सदरचे प्रकरण विद्यमान जिल्हा न्यायाधीश क्र २ स्पेशल केस न ११३/२०२१ अनुषंगाने न्यायालयात प्रलंबित अस्ताना आरोपीणे सदरचे प्रकरण खोटे असुन त्याना खोट्ट्या प्रकरणात रोवण्यात आले असल्या मूळे विद्यमान उच्च न्यायालय नागपुर खंडपीठ हयाच्या समोर सदरचे गुन्हा चार्ज शीट व सुरु असलेले विद्यमान जिल्हा न्यायालय यवतमाल ह्यांच्या समोर प्रलंबित असलेले फ़ौजदारी केस खारिज करण्यात यावे करिता एड राहुल शिंदे व एड सपना जाधव यांच्या मार्फ़त अर्ज सदर केले

सदर प्रकरणत विद्यमान उच्च न्यायालय हयानी चार्जशीट मधिल साक्षदराँचे बयान पाहून प्रकरणातील दस्त ऐवज़ चे पड़तालनी करुण सदरचे प्रकरण मधिल दोन्ही बाजूँचे म्हनने ऐकून सदरचे गुन्हा क्र २९६/२०२१ व जिल्हा न्यायालय यवतमाल यथे न्याय प्रविष्ट असलेले स्पेशल केस न ११३/२०२२ खारिज करुण आरोपिस मुक्त केले सदर प्रकरण मध्ये एड राहुल शिंदे व एड सपना जाधव यांचे सहकार्य एड निलेश टीकर व एड विक्की गोखले यानी केले.

# जमिनीच्या अकृषिक वापरानंतर आता 'सनद'ची अटही रद्द!

## ♦ महसूलमंत्र्यांचा ऐतिहासिक निर्णय
## ♦ रेडी रेकनरच्या दरावर प्रीमियमचे दर निश्चित

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अमरावती :** राज्यातील जमीन महसूल प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी राज्य सरकारने आणखी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अकृषिक परवानगीची अट रद्द केल्यानंतर आता त्यापुढील 'सनद' घेण्याची अटही रद्द करण्यात आली असून या संदर्भातील 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक २०२५' महसूलमंत्री चंद्रशेखर बानकुळे यांनी विधानसभेत मांडले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत या विधेयकाची पार्श्वभूमी मांडताना स्पष्ट केले की, १९६६ च्या जमीन महसूल संहितेमध्ये २०१४ ते २०१८ दरम्यान सुधारणा करून रहिवासी आणि वाणिज्यिक वापरासाठी 'एन.ए.' (अकृषिक) परवानगीची अट यापूर्वीच शिथिल करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही 'सनद' घ्यावी लागत असल्याने प्रक्रियेत क्लिष्टता होती. आता ही अट पूर्णपणे काढून टाकण्यात आली असून, त्याऐवजी नाममात्र प्रीमियम (अधिमूल्य) आकारला जाणार आहे.

जमिनीच्या वापरासाठी आता सनदची गरज नसून, खालीलप्रमाणे रेडी रेकनरच्या (बाजारमूल्य) आधारावर प्रीमियम भरून वापर नियमित करता येईल. १००० चौरस मीटरपर्यंत : रेडी रेकनरच्या ०.१ टक्का. १००१ ते ४००० चौरस मीटरपर्यंत: रेडी रेकनरच्या ०.२५ टक्के. ४००१ चौरस मीटर व त्यापुढील भूखंडांसाठी : रेडी रेकनरच्या ०.५ टक्के. या बदलामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणाऱ्या करात किंवा शुल्कात कोणतीही कपात होणार नसून, त्यांना त्यांचा वाटा मिळणार असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे.

### विरोधकांकडून स्वागत

◆या विधेयकावर चर्चा करताना विरोधकांनी या निर्णयाचे स्वागत केले. अकृषिक कराची अट रद्द करून सनदची प्रक्रिया सोपी केल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. आमदार विक्रम काळे, प्रवीण दटके, योगेश सागर, रमेश बोरनारे, जयंत पाटील यांनी विधेयकाचे स्वागत तर महसूलमंत्री बावनकुळे यांचे अभिनंदन केले. काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी यावेळी शेतजमिनी वाचवण्याचा मुद्दा उपस्थित केला. 'शहरीकरणामुळे कृषक जमीन कमी होत चालली आहे आणि दुसरीकडे पुरामुळे नदीकाठची जमीन खरडून जात आहे. त्यामुळे कृषक जमीन टिकवणे हे मोठे आव्हान असल्याचे मत त्यांनी मांडले.'

# ध्वजदिन निधी संकलनात जिल्ह्याची उत्कृष्ट कामगिरी

## ♦ राज्यपालांच्या हस्ते जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार

प्रतिनिधी ११ डिसेंबर



**अमरावती :** ध्वजदिन निधी संकलनात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचा सत्कार करण्यात आला. मुंबई येथील लोकभवनातील जय विहार येथे हा कार्यक्रम पार पडला. राज्यपाल यांच्या स्वाक्षरीचे प्रशस्तीपत्र आणि स्मृती चिन्ह असे गौरवाचे स्वरूप आहे. सत्कारावेळी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाठारकर उपस्थित होते. जिल्ह्याला २०२४-२५ या वर्षासाठी १ कोटी २३ लाख रूपयांचे लक्ष्य देण्यात आले. त्या तुलनेत १ कोटी ६४ रूपयांचा निधी संकलित करण्या आला. जिल्ह्याने निधी संकलनात अमरावती विभागात अव्वल स्थान पटकावले असल्याने हा सन्मान करण्यात आला. संकलित निधी माजी सैनिक आणि त्यांच्या अवलंबितांच्या कल्याणासाठी उपयोगात आणल्या जाणार आहे. जिल्ह्याने ध्वजदिन २०२४ साठी देण्यात आलेले उद्दिष्ट काही महिन्यांत पूर्ण केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी इष्टांकापेक्षा अधिक निधी गोळा केला आहे. यामुळे युद्धविधवा, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याण व पुनर्वसन, तसेच कल्याणकारी योजना राबवण्यासाठी मदत होणार आहे.

# सातुर्णा परिसरातून दहशत पसरविणाऱ्या इसम ताब्यात

## अवैध शस्त्रे जप्त, अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अमरावती:** शहरातील सराईत गुन्हेगांरावर पाळत ठेवुन त्यांचा शोध घेवुन त्यांचेवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत मा. पोलीस आयुक्त चावरिया, यांनी आदेशीत केल्यावरून अमरावती शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक . संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी गुप्त माहितीदार नेमुण खालील प्रमाणे कार्यवाही केली आहे.

१०/१२/२०२५ रोजी गुन्हे शाखेचे पथकास गोपनिय माहीती मिळाली की, मंथन पाळणकर रा सातुर्ण अमरावती नावाचा इसम हा सातुर्णा चौका लगत त्याच्या घरासमोर कमरेला चाकु लावुन तसेच त्याच्या हातातील थैली मधे शस्त्रे घेवुन गुन्हा करण्याच्या उददेशाने जाण्याच्या तयारीत उभा आहे.

अशा मिळालेल्या माहीती वरून गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद इसमास मोठ्या शिताफीने ताब्यात घेवुन त्याच्या ताब्यातुन एकुण ४,३००/- रू वे घातक शस्त्रे जप्त करण्यात आले. नमूद आरोपी याचेविरूदध पो.स्टे. राजापेठ येथे कलम ४/२५, आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे.सदरची कामगिरी. पोलीस आयुक्त . अरविंद चावरीया पोलीस उपायुक्त . गणेश शिंदे . पोलीस उपायुक्त श्याम घुगे . पोलीस उपायुक्त . रमेश धुमाळ . सहाय्यक पोलीस आयुक्त. शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखे चे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वाखाली पोउपनि गजानन सोनुने, दिपक सुंदरकर, जहीर शेख, संग्राम भोजने, अतूल संभे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, राजीक रायलीवाले, योगेश पवार. यांचे पथकाने केली आहे.

# मध्यवर्ती कारागृहात 'मानवी हक्क आणि संरक्षण'बाबत जागृती

प्रतिनिधी ११ डिसेंबर



**अमरावती :** विधी सेवा प्राधिकरण आणि मानवी हक्क आयोग, तसेच कारागृह विभागातर्फे आज कारागृहातील बंद्यांसाठी आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवसाचे औचित्य साधून बंद्यांचे 'मानवी हक्क आणि संरक्षण' याबाबत कायदेविषयक जागृती करण्यात आली. बंद्यांना मानवी हक्काची माहिती व्हावी, यासाठी अमरावती मध्यवर्ती कारागृहात कार्यक्रम पार पडला. यावेळी पोलिस आयुक्त अरविंद चावरीया, अधीक्षक किर्ती चिंतामणी, ॲड. अमित सहारकर उपस्थित होते.

पोलिस आयुक्त अरविंद चावरीया यांनी कारागृहातील बंद्यांना शिस्तीचे वर्तन करुन नियमाचे पालन करावे. मानवी अधिकाराचे उल्लंघन झाल्यास कायदा आहे, त्यामूळे कोणाच्याही अधिकाराचे उल्लंघन करु नये, सर्व धर्मग्रंथाचे वाचन केल्यास मानवी मुल्य जपली जातील. तसेच स्वत:मधील मीपणाची भावना कमी झाल्यास मानवी मुल्ये जपता येतील, असे सांगितले. न्यायरक्षक कार्यालयाचे ॲड. अमित सहारकर यांनी, बंद्यांचे कारागृहातील हक्क व कर्तव्ये या विषयी माहिती दिली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डी. एस. वमने यांनी प्रास्ताविक केले. कारागृह शिक्षक ललित मुंडे यांनी सुत्रसंचालन केले. कारागृह अधीक्षक किर्ती चिंतामणी यांनी आभार मानले. कारागृहातील उपअधीक्षक प्रदिप इंगळे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी देवराव जाधव, शामराव गिते, मंडल तुरुंगाधिकारी धनसिंग कवाळे, कारागृह शिक्षक संजय घोलप, प्रवीण धर्माळे, गोपाल कचरे, सुभेदार राहूल पंधरे, उमेश साबळे, कृष्णकांत सांबारे, पवन ईखार, यादव कातोरे यांनी पुढाकार घेतला.

# 'अमृत'च्या विभागीय कार्यालयाचे उद्घाटन

प्रतिनिधी ११ डिसेंबर



**अमरावती :** खुल्या गटातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी 'अमृत'च्या अमरावती विभागीय कार्यालयाचे आज उद्घाटन पार पडले. अमरावतीतील आशीर्वाद बिल्डिंग, मालटकेडी समोर, बसस्टँड रोड, टोपेनगर येथे कार्यालयाचे उद्घाटन संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रबंधक संचालक सिद्धेश्वर वरणगावकर, राज्य व्यवस्थापक दीपक जोशी, नाशिक विभागीय व्यवस्थापक मंगेश खाडीलकर, अमरावती विभाग व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर, तसेच जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटूरवार उपस्थित होते. विजय जोशी यांनी, जिल्ह्यात 'अमृत'चे कार्यालय सुरू झाल्याने कौशल्य विकास, प्रशिक्षण, रोजगारनिर्मिती, प्रमाणपत्र अभ्यासक्रम, स्वयंरोजगार संधी आणि औद्योगिक मार्गदर्शन अधिक सुलभ आणि प्रभावीपणे उपलब्ध होणार आहे. यामुळे जिल्ह्यातील युवकांना रोजगार व उद्योजकतेच्या नव्या दिशांना चालना मिळणार असल्याचे सांगितले.राज्यात विविध उपक्रम राबवणारी अमृत संस्था युवकांना रोजगारक्षम बनविण्यासाठी सातत्याने प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि औद्योगिक कौशल्य विकासाचे प्रबोधन करीत आहे. आता या सर्व सुविधा अमरावतीमध्ये स्थानिक पातळीवर उपलब्ध होत असल्याने अनेक उपक्रमांची अंमलबजावणी जलदगतीने होणार आहे. यावेळी विविध उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते तसेच अमृतचे लाभार्थी यांच्या यावेळी भेटी घेण्यात आल्या. उद्घाटन कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, विविध जिल्ह्यातील अधिकारी, तसेच अमृत संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट | खामगाव

# जीएसटी अधिकाऱ्यांचे सामूहिक रजा आंदोलन

## ♦ खामगावात उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**खामगांव :** राज्याच्या महसुलात तब्बल ७० टक्के वाटा उचलणाऱ्या जीएसटी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी १० डिसेंबर रोजी सामूहिक रजा आंदोलन पुकारले. या आंदोलनात अधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत प्रशासनाचे लक्ष वेधले.

जीएसटी कार्यालयातील बैठक सुविधा, पायाभूत सोयीसुविधा, तसेच इतर प्रशासकीय मागण्यांवर वारंवार पाठपुरावा करूनही कोणताही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे अधिकाऱ्यांनी आंदोलनाचा रास्त मार्ग अवलंबला, आंदोलनाची सुरुवात ८ डिसेंबर रोजी घेण्यात आलेल्या द्वार सभेने झाली. त्यानंतर - ९ डिसेंबर रोजी सर्व अधिकाऱ्यांनी -काळी फीत लावून शांततामय - आंदोलन करत प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली. आंदोलनाचा तिसरा आणि निर्णायक टप्पा म्हणून १० डिसेंबरपासून संपूर्ण विभागाने सामूहिक रजेवर जाण्याचा निर्णय घेतला. खामगावात या आंदोलनाला १० डिसेंबर रोजी शंभर टक्के प्रतिसाद मिळाल्याची माहिती संघटनांकडून देण्यात आली. या आंदोलनात सहाय्यक आयुक्त मोहन गावंडे, सहाय्यक आयुक्त आत्माराम अवचार, राज्य कर अधिकारी लता शेंडे, विजयालक्ष्मी तायडे, माधुरी कविटकर, श्रीकांत थोरात, डॉ. माधव वानखडे, नीतू कोठे, वैशाली अवचट यांच्यासह मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी झाले. अधिकाऱ्यांच्या या भूमिकेमुळे राज्य प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाढू लागली आहे.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; गुन्हा दाखल

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**खामगांव:** कामानिमित्त घराबाहेर आलेल्या एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा गल्लीतच राहणाऱ्या इसमाने विनयभंग केल्याची घटना दुपारी ३ वाजताच्या सुमारास शेगाव तालुक्यातील एका खेड्या गावात घडली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, याबाबत वृत्त असे की, शेगाव तालुक्यातील जलंब पो. स्टे. अंतर्गत येत असलेल्या एका गावातील १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही कामधंदा करत असताना तिला आरोपी हा इशारे करून खुणावून घरी बोलवत होता. दुपारी फिर्यादी ही घरी एकटी असताना कामानिमित्त बाहेर आली असता आरोपी हा फिर्यादी मुली जवळ आला व विनयभंग केला व मी माझा जीव देईल व चिठ्ठी लिहून तुझे नाव घेईल अशी धमकी सुद्धा फिर्यादीला दिली. अशी तक्रार सदर अल्पवयीन मुलीने जलंब पोस्टेला दिली. यावरून पोलिसांनी आरोपी विरुद्ध अप नं. २८४/२५ कलम ७४,७८ ँए -२०२३ कलम ८,१२ बाल लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२ पोस्को अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार अमोल सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय आहे.

# अमरावती-जळगाव खा. राष्ट्रीय महामार्गालगतच्या उघड्या विहिरी बुजवा!

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**खामगांव :** अमरावती-जळगाव खान्देश राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम दोनतीन वर्षांपूर्वी पूर्ण झाले असले तरी रस्त्यालगत असलेल्या उघड्या विहिरींचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे. रस्त्यालगतच्या सर्व उघड्या विहिरींचा तत्काळ शोध घेऊन त्यांच्यावर मजबूत सुरक्षा जाळी बसविण्यात यावी किंवा त्या विहिरी मुरूम टाकून पूर्णपणे बुजविण्यात याव्यात, अशी मागणी केली आहे. कार रस्त्यालगतच्या उघड्या विहिरीत कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने महामार्गावरील सुरक्षेच्या गंभीर त्रुटींचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे. महामार्गाच्या चौपदरीकरणावेळी परिसरातील शेतजमिनी भूसंपादन करताना अशा विहिरी तात्काळ बुजवणे किंवा त्यांच्यावर सुरक्षा जाळी बसवणे अत्यावश्यक होते. मात्र राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या महत्त्वाच्या सुरक्षाविषयक बाबीकडे दुर्लक्ष केल्यानेच अशी दुर्घटना घडल्याचा आरोप आहे. नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेत नांदुरा तालुक्यातील वडनेर भोलजी परिसरात एका दांपत्याची कार रस्त्यालगतच्या उघड्या विहिरीत कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने महामार्गावरील सुरक्षेच्या गंभीर त्रुटींचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे. महामार्गाच्या चौपदरीकरणावेळी परिसरातील शेतजमिनी भूसंपादन करताना अशा विहिरी तात्काळ बुजवणे किंवा त्यांच्यावर सुरक्षा जाळी बसवणे अत्यावश्यक होते. मात्र राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या महत्त्वाच्या सुरक्षाविषयक बाबीकडे दुर्लक्ष केल्यानेच अशी दुर्घटना घडल्याचा आरोप आहे.

# नगर पालिका निवडणुकीत शितल माळवंदे यांचा अर्ज मागे

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**खामगांव :** खामगाव नगर पालिकेच्या चार जागांसाठी २० डिसेंबर रोजी होवू घातलेल्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार शितल प्रितम माळवंदे यांनी आपला उमेदवारी अर्ज १० डिसेंबर रोजी मागे घेतला. त्यामुळे प्रभाग ७अ मध्ये काँग्रेसच्या शारदा विनोद माळवंदे आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे गायत्री निलेश तासतोडे यांच्यात सरळ सरळ लढत होणार असल्याचे चित्र आहे. खामगाव नगरपालिकेत निवडणूक रिंगणात कायम असलेल्या उमेदवारांना आज ११ डिसेंबर रोजी निवडणूक चिन्हाचे वितरण होईल.निवडणूक आयोगाच्या सुधारीत कार्यक्रमानुसार चार जागांची निवडणूक लांबणीवर पडली असून २० डिसेंबर रोजी शहरातील प्रभाग ५ अ, ७ अ, ९ अ आणि १६ अ मध्ये निवडणूक होईल. या निवडणूकीत प्रभाग ५ अ मध्ये काँग्रेसच्या शिला गजानन जांभे, भाजपाच्या निलिमा प्रसाद डोरले, राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या विद्या राम बुरंगी तर प्रभाग ९ मध्ये काँग्रेसच्या अहेमद महेरुनिस्सा रियाज, भाजपच्या गायत्री सत्यनारायण थानवी यांच्यात तर प्रभाग १६ अ मध्ये भाजपच्या रेखा गणेश जाधव, शिंदे सेनेच्या पुष्पा मोहन ठोंबरे, काँग्रेसच्या लक्ष्मी घनश्याम सावरकर यांच्यात लढत होईल. निवडणुकीच्या अनुषंगाने या प्रभागातील राजकीय वातावरण तापले आहे.

सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०२५

## हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन

**अकोला:** कु शिवाणी गणेश नाइक वय १९ वर्ष ३ महिने रा पोलीस वसाहत डाबकी रोड अकोला ही युवती २७ ऑक्टोबर २०२२ रोजी दुपारी चार वाजता घरी कोणालाही न सांगता निघून गेली आहे. घरच्या लोकांनी व नातेवाईकांनी शोध घेतला असता तो मिळून आली नाही.अंगात चमकेली रंगाची त्यावर लाल रंगाची ठिपके असलेली टि शर्ट व काळया रंगाचा प्लाझो, उंची ४ फुट रंग गोरा चेहरा गोल, डोळे किंचीत घारसे असे वर्णन आहे ज्यांना या युवतीची माहिती मिळाल्यास त्यांनी पोलीस स्टेशन, डाबकी रोड, अकोला येथे संपर्क साधावा. (दू. नं.०७२४-२४४५३४०)

## विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या दृष्टीने इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील को-एज्युकेशन, फी संस्कृतीला आळा घाला



प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अकोला:** विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या दृष्टीने इंग्रजी माध्यमाच्या शाळातील को-एजुकेशन व फी संस्कृतीला आळा घालण्याची मागणी एका निवेदनात करण्यात आली. भाजपा ओबीसी मोर्चाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष मनीष गावंडे आणि सहका-यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदन दिले.

नुकतीच सेंट ॲन्स शाळेमध्ये १३ वर्षाच्या मुलीने केलेली आत्महत्या ही विद्यिर्थीनीच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने अत्यंत दुर्देवी बाब आहे. अकोला शहरात तथा ग्रामीण भांगात अनेक ईग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये खाली नमुद केल्याप्रमाणे काही गंभीर बाबी निदर्शनास येत आहे. करीता आपण संबंधीत शाळांना योग्य ते निर्देश देउन कडक अंमलबजावणी करावी अशी मागणी केली.

मुलगा व मुलगी यांना एकाच बेंच वर न बसवता मुलांची व मुलींची रांग वेगळी असावी, ज्या शाळांमध्ये २ तुकडया आहेत तेथे मुलांचा व मुलींचा वर्ग वेगळा असावा, शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलन वा इतर सहशालेय उपक्रमात मुला-मुलींचे एकत्रीत कार्यक्रम घेऊ नये, शिक्षक-पालक शिक्षक संघा बैठकीची अंमलबजावणी कागदावर न घेता प्रत्यक्ष सभा आयोजीत करण्यात याव्यात, विद्यार्थी तक्रार पेटीची प्रभावी अंमलबजावणी करावी असे मनीष गावंडे यांनी निवेदनात म्हटले आहे.

## डवले पब्लिक स्कूलमध्ये अभिनव संशोधन विज्ञान प्रदर्शनी





### ♦ नर्सरी ते बारावी पर्यंत विद्यार्थ्यांचे पासष्ट प्रयोग सादर

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अकोला:** विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा वाढवण्यासाठी आणि सर्जनशीलतेच्या माध्यमातून त्यांच्या बुद्धीचा विकास करण्याच्या उद्देशाने, मोठी उमरी येथील स्थानिक डवले पब्लिक स्कूलमध्ये शालेय स्तरावर विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनीत नर्सरी ते १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मिळून ६५ विविध प्रयोग तयार केले. तसेच, विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून उच्च दर्जाच्या वैज्ञानिक प्रतिकृती बनवल्या.

उत्साहात पार पडलेल्या या विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन वैज्ञानिक डॉ. नितीन ओक यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी डॉ. नितीन ओक यांनी समाधान व्यक्त करत सांगितले की, डवले पब्लिक स्कूलची सातत्याने प्रगती होत आहे.

शाळेतील शाश्वत ठाकरे याने अपघातांना प्रतिबंध करण्यासाठी एक सेन्सर ॲप तयार केले आहे. यामध्ये, जर कारचा अपघात झाला, तर सेन्सर सक्रिय होईल आणि अपघात विभाग तसेच पोलीस विभागाला आपोआप संदेश जाईल.

यासोबतच, रस्त्यावर वाहन चालवताना सर्व दिवे सौर ऊर्जेवर चालले पाहिजेत. तसेच, गाडी पुढे गेल्यावर दिवे आपोआप बंद होतील, असे मॉडेलही प्रदर्शनीत बनवले आहे. केवळ पुस्तकी ज्ञानाऐवजी कलात्मकता आणि बुद्धिमत्तेच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल, यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.


यावेळी गोपाळ सूर आणि विकास राठोड यांनी विज्ञान प्रदर्शनीची पाहणी केली. डॉ. नितीन ओक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या ज्ञानात भर घातली.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश डवले यांच्या हस्ते डॉ. नितीन ओक यांचा आणि डॉ. अभिजीत डवले यांच्या हस्ते विकास राठोड यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापिका मेघा निखिल नालट यांनी केले.

संस्थेच्या प्रा. कविता बलिंगे आणि श्रीमती मृणाली डवले यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. डवले पब्लिक स्कूलच्या सर्व शिक्षकांनी विज्ञान प्रदर्शनी यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. ही प्रदर्शनी विविध प्रयोगांनी परिपूर्ण होती. चांद्रयान-३ रॉकेट लॉँचरने सर्व विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष वेधून घेतले. चांद्रयानाची संकल्पना पल्लवी मनमुते मॅडम, नेहा काकड, मयूर भरणे आणि साहिल कलसारे यांनी तयार केली होती. त्यांनीच चांद्रयानाला जल आणि वायूद्वारे इंधन पुरवले होते. भविष्यात डवले पब्लिक स्कूल राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनीमध्ये आपले नाव कमवेल, अशी आशा व्यक्त करण्यात आली. रॉकेट लॉँचर आकाशात झेपावताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

प्रा. प्रकाश डवले म्हणाले की, विद्यार्थ्यांना शक्य तितके समान बनवणे, हे आमच्या संस्थेचे उद्दिष्ट आहे. डॉ. अभिजीत डवले आणि श्रीमती मृणाली डवले यांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे प्रदर्शन यशस्वी झाल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूषण गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. मृणाली डवले यांनी केले.

## शाकंभरी प्राकट्य उत्सवात भक्तीभावात होणार काशीची गंगा आरती



प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अकोला :** स्थानिक शक्ति धाम सेवा समितीच्या वतीने महानगरात आयोजित माता शाकंभरी प्राकट्य उत्सवात काशी येथील पुरोहित वर्गाच्या वतीने भव्य प्रसिद्ध गंगाआरती होणार असून यासाठी खास काशीवरून पुरोहित गंगा आरती उपकरण समवेत महानगरात येत आहेत.पौष पौर्णिमा दि ३ जानेवारी २०२६ रोजी दु.३-३० वाजता स्थानीय गीता नगर परिसरातील शक्तीधामच्या प्रांगणात हा प्रागट्य उत्सव होत आहे.या उत्सवात उत्तर प्रदेश मधील नान पारा धाम येथील प्रसिध्द मंगलपाठ गायक श्रीकुमार शानु हे मातेचा भव्य संगीतमय मंगलपाठ सादर करणार आहेत.

## महानगरात तीन दिवसीय भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अकोला:** गोरक्षण व गोसंवर्धन सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाच्या वतीने महानगरात किर्तन सेवेकरी स्व. सौ शालिनी वामनराव नाईकवाडे यांच्या स्मृतीत तीन दिवसीय भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १९ ते २१ डिसेंबर पर्यंत नित्य सायं.५-३० ते रात्री ७-३० पर्यंत स्थानीय प्रमिलाताई ओक हॉल सभागृहात हा कीर्तन महोत्सव होणार आहे.या किर्तन महोत्सवात राज्यातील विविध विषयावरील तज्ञ ख्यातनाम कीर्तनकाराची उपस्थिती लाभणार आहेत. महोत्सवात शुक्रवार दि. १९ डिसेंबर रोजी सायं. ५-३० वाजता पुणे येथील हभप हर्षद बुवा जोगळेकर यांचे ठविठ्ठल भक्त जळोजी-मळोजीठ या विषयावर कीर्तन होणार आहे. शनिवार दि. २० डिसेंबर रोजी पुणे येथील हभप लक्ष्मीप्रसाद बुवा पटवारी यांचे ठबाजीप्रभू देशपांडेठ यावर आधारित कीर्तन होऊन रविवार दि. २१ डिसेंबर रोजी अकोला येथील हभप डॉ अभय कुलकर्णी यांचे ठलत्नीतांचे कीर्तनठ यावर आधारित कीर्तन होऊन या कीर्तनाने या महोत्सवाचा समारोप होणार आहे.

## रोटरी क्लब अकोट विजनच्या शिबिरात ४५ दात्यांनी केले रक्तदान





प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अकोट:** रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० मध्ये ८ डिसेंबर रोजी सामूहिक रक्तदान शिबिर घेण्यात आले. मिशन लाईफ कार्यक्रमांतर्गत रोटरी व्हिजन अकोट च्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन डॉ. किरण भुस्कट यांच्या रिद्धी क्लिनिक येथे करण्यात आले होते. या रक्तदान कार्यक्रमात शहरातील लोकांनी भरभरून प्रतिसाद देत ४५ रक्त दात्यांनी रक्तदान केले.

सकाळपासूनच रक्तदात्यांचे गर्दी या ठिकाणी पाहायला मिळाली. या कार्यक्रमात रक्त संकलन करण्याकरीता शासकीय रक्तपेढी अकोला यांचे सहकार्य लाभले या कार्यक्रमाचे सफल नियोजन नंदकिशोर शेगोकार असिस्टंट डिस्टिक गव्हर्नर, संजय बोरोडे, अनंता काळे यांच्या मार्गदर्शनात आनंद भोरे, अतुल मालानी यांच्या नेतृत्वात प्रकल्प प्रमुख म्हणून संदीप भुस्कट अक्षय शेगोकार व.प्रवीण बनसोड यांचे सोबत मिळुन कार्यक्रम सफल केले या कार्यक्रमात रोटरी चे सर्व सदस्य बिहाडे सर, बाबुराव झामरे, उमेश पवार, किरण गुहे, संदीप बोबडे ,शिरीषभाई वंजारा ,चेतन उपासे, अक्षय शेगोकार, अभिजीत अग्रवाल, सचिन मारु, सागर बोरोडे, अनिल पालेकर, अतुल भिरडे उपस्थित होते. सदर रक्तदान शिबिरास अकोट शहरातील अनेक गणमान्य लोकांनी येऊन रक्तदान केले कथा भेटी देऊन शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता शेतकरी समूहाचे कृष्णा नाथे अजिंक्य नाथे, दर्शन ठाकूर, वैभव काळे, बंडूभाऊ काळे, नावेद खान यांनी कार्यक्रमात यशस्वी ते करिता प्रयत्न केले अशी अशी अशी माहिती रोटरी व्हिजनचे जनसंपर्क अधिकारी नितीन शेगोकार कळवितात.

## जिल्ह्यातील २४ वाळूघाटांच्या ई- लिलावाला मुदतवाढ

**अकोला:** जिल्ह्यातील अकोला बाळापुर तालुक्यातील १० वाळू घाटांच्या लिलावाला चौथी मुदतवाढ देण्यात आली आहे. यामध्ये अकोला तालुक्यातील कपिलेश्वर, एकलारा, म्हैसांग, उगवा बाळापुर तालुक्यातील निंबी, बहादूरा , सागद,नागद,डोंगरगाव मांजरी वाळूघाट समाविष्ट आहेत तर मूर्तिजापूर बाळापूर आणि तेल्हारा तालुक्यातील १४ वाळू घाटांना ई लिलावासाठी प्रथम मुदतवाढ देण्यात आली आहे.यामध्ये मुर्तीजापुर तालुक्यातील लाखपुरी २, विरवाडा, कोळसरा- १, खापरवाडा-२(खैरी), दुर्गवाडा, लोनसना, सांगवी, बपोरी, पिंगळा दापुरा, बाळापुर तालुक्यातील काजीखेड-२,हिंगणा शिकारी, मोखा, स्वरूपखेड, जानोरीमेळ तेल्हारा तालुक्यातील वांगरगांव वाळूघाटांचा समावेश आहे.

## न्यू ईरा हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन

### ♦ राज्यभरातून माजी विद्यार्थी सहभागी होणार

प्रतिनिधी ११ डिसेंबर



**अकोला:** न्यू ईरा हायस्कूल मध्ये पुन्हा एकदा शाळेची घंटा ध्वनित होणार आहे. १९४२ साली स्थापन झालेल्या या शाळेतील १९५३ पासूनचे हजारो माजी विद्यार्थी येत्या २७ डिसेंबर रोजी आयोजित भव्य स्नेहमिलनासाठी एकत्र येणार आहेत. सकाळी ८.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत भरविण्यात येणारा हा सोहळा ऐतिहासिक राहील असा आयोजकांना विश्वास आहे.

आजवर शाळेत अनेक माजी विद्यार्थी मेळावे झाले असले तरी १९६० ते २०१५ दरम्यान शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर एकत्रीकरण होत आहे. २५ ते ८६ वयोगटातील विद्यार्थी अकोला जिल्ह्यातील विविध भागातून, राज्यातील विविध शहरांतून तसेच परदेशातून- उत्साहाने सहभागी होत असून, ७०० पेक्षा अधिक माजी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

या स्नेहमिलनात एकाच शाळेत शिकलेले भाऊ-बहीण, आई-वडीलही विद्यार्थी म्हणून जुन्या आठवणींना पुनःश्च उजाळा देणार आहेत. जुन्या वर्गखोल्या, शाळेची इमारत आणि प्रिय शिक्षक-शिक्षिकांसोबत गाठीभेटी घडणार असल्याने माजी विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्नेहमिलन यशस्वी होण्यासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे. स्वागत, नोंदणी, सांस्कृतिक, खाद्यव्यवस्था, प्रसारमाध्यम, निवास-व्यवस्था, मंच संचालन, सजावट, स्मरणिका आदी स्वतंत्र समित्या कार्यरत असून, प्रत्येक समितीने नियोजनाची तयारी सुरू केली आहे. सर्वांनी आपल्या वर्गमित्र-मैत्रिणींसह नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी रविवार, ३० नोव्हेंबर रोजी शाळा परिसरात बैठक पार पडली. प्रा. विश्वनाथ भार्गव गद्रे अध्यक्ष, प्रागतिक शिक्षण प्रसारक मंडळ म्हणाले, 'जुन्या आठवणींना उजाळा देण्याची ही सुवर्णसंधी माजी विद्यार्थ्यांना आनंद देत आहे. परदेशात राहणारे अनेक विद्यार्थीही सहभागी होणार असल्याने हा सोहळा संस्मरणीय ठरणार आहे.' बैठकीस जयंत मराठे उपाध्यक्ष, प्रागतिक शिक्षण प्रसारक मंडळ व कार्यक्रम समिती अध्यक्ष, मुख्याध्यापक महेश ठोके तसेच आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते.

## लेखिका संमेलनानिमित्त महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी ब्लॉग लेखन व काव्यलेखन कार्यशाळा

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अकोला:** विदर्भ साहित्य संघ; शाखा अकोला तर्फे २५ डिसेंबर २०२५ रोजी एक दिवसीय लेखिका संमेलनाचे आयोजन 'स्व. प्रा.भाऊसाहेब मांडवगणे साहित्य नगरी', प्रभात किड्स स्कूल परिसर, वाशिम रोड, अकोला येथे होणार आहे. संमेलनानिमित्त महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी 'ब्लॉग लेखन कार्यशाळा' आणि 'काव्यलेखन कार्यशाळेचे' आयोजन करण्यात येत आहे. ब्लॉग लेखन कार्यशाळेला लेखिका व सायबर तज्ज्ञ मोहिनी मोडक आणि काव्यलेखन कार्यशाळेला लेखिका व अनुवादक प्रा.डॉ. स्वाती दामोदरे हे मार्गदर्शन करणार आहेत. सदर दोनही कार्यशाळेसाठी प्रवेश हा निःशुल्क असून प्रथम नाव नोंदवणाऱ्या प्रत्येकी फक्त १०० सहभागींनाच संधी देण्यात येईल. तसेच सहभागाचे आकर्षक प्रमाणपत्र देण्यात येईल. ब्लॉग लेखनाची आणि काव्यलेखनाची आवड असणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी या कार्यशाळेमध्ये सहभागी होण्यासाठी लेखिका संमेलन कार्यालय, प्रभात किड्स, तोष्णीवाले ले-आऊट, शासकीय दूध डेअरीच्या मागे, अकोला येथे ८८०६६६७१०५/ ८८०६६६७१०७ सकाळी ९.०० ते सायं. ५.०० संपर्क साधून १७ डिसेंबर २०२५ आपली नाव नोंदणी करावी असे आवाहन विदर्भ साहित्य संघ; शाखा अकोलाचे अध्यक्ष विजय कौसल, संमेलनाचे मुख्य कार्यवाह डॉ. गजानन नारे आणि संमेलन सरचिटणीस मोहिनी मोडक यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616

बातम्यासाठी संपर्क 9075012801

## देगांवमध्ये जागतिक मानवाधिकार दिन उत्साहात साजरा



प्रतिनिधी ११ डिसेंबर

**देगांव :** बाळापूर तालुक्यातील देगांव येथील क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले सार्वजनिक वाचनालयात जागतिक मानवाधिकार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते आकाश इंगळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करण कोसे यांनी केले. मानवाधिकारांचे महत्व स्पष्ट करताना प्रांजली अंभोरे म्हणाल्या की, ठमानव असेल तर जन्मताच मिळणारे हक्क म्हणजे मानवाधिकार. हे हक्क जात, धर्म, लिंग, भाषा किंवा देशावर अवलंबून नसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत जीवनाचा हक्क, समानतेचा हक्क, शिक्षणाचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, अत्याचारापासून मुक्ती, कामाचा व सन्मानाने जगण्याचा हक्क सर्व नागरिकांना दिल्याचा उल्लेख करत अध्यक्ष आकाश इंगळे यांनी सांगितले. कार्यक्रमात अंजली अंभोरे, राधिका गावंडे, प्रांजली अंभोरे, रेखाबाई इंगळे, आर्वी मोरे, करण कोसे, प्रथमेश अंभोरे, विश्वनाथ इंगळे, सौरभ गावंडे, रुद्र सावनकार, अभी इंगळे तसेच वाचक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन राधिका गावंडे यांनी केले.

## आसरा माता महिला गुरूदेव सेवा मंडळ कार्यक्रम



प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अकोला:** आसरा माता महिला गुरुदेव सेवा मंडळ डाबकी रोड, अकोलाच्या वतीने श्री गुरुदेव तुकडोजी महाराजांची सामुहिक प्रार्थनेचा कार्यक्रम झाला. महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सामूहिक प्रार्थनेत महिला व पुरुष उपासक, उपासिका यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी गुरुदेव महिला मंडळाच्या अध्यक्ष सौ. नंदाताई आखरे, माजी उपमहापौर वैशालीताई शेळके, वैशालीताई सावळे, शिरोडकर ताई इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन सीमा ताई इंगळे, ज्योती पाटील, मीनाताई कावरे, सोनालीलाई काळवंडे, मयुरीताई बाळापुरे, शर्मिलाताई पाली, उज्वलाताई, जयाताई काळबांडे, निताताई बावस्कर, शारदाताई वर्मा यांच्या सहकार्याने कार्यक्रम आनंदात पार पडला.

## लहुजी शक्ती सेना व मातंग समाज बांधवांनी महामोर्चात सामील व्हा - वामनराव भिसे



प्रतिनिधी ११ डिसेंबर

**अकोट:** लहूश्री विष्णू भाऊ कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः मुंबईतेनागपूर २ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर पर्यंत चा मातंग समाजाच्या विविध मागण्यांकरिता मातंग समाज हा एकवटला आहे. देवाभाऊ यांच्या सरकारने मातंग समाजाला केवळ आश्वासनाचीच पूर्तता केल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे हे सरकार मातंग समाजाच्याच नव्हे तर ५९ जातीच्या अतिशय महत्त्वपूर्ण मागण्या मान्य करून घेण्याकरता जागी झाले पाहिजे म्हणून लहुजी शक्ती सेनेच्या वतीने महाराष्ट्र पिंजून काढत, या महापद यात्रेचे रूपांतर महामोर्चा मध्ये होणार आहे. यात सामील व्हा असे आवाहन वामनराव भिसे यांनी केले.

लहुजी शक्ती सेनेच्या कार्यकर्त्यांनी अकोला येथे बैठक घेतली. मातंग समाजाच्या कार्यकर्त्यांनी नागपूरच्या महामोर्चा मध्ये सामील होण्याची ही आज रोजी काळाची गरज आहे.. आजच्या महत्त्वपूर्ण बैठकीमध्ये वामनराव भिसे यांनी अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. प्रकाश दांडगे , मुकुंदा अंजनकार ,जानराव गवळी , प्रभाकर बोरकर, अकोला जिल्हा जिल्ह्यामधील अनेक संघटना यामध्ये सहभागी होण्यासाठी अशा विविध कार्यकर्त्यांनी महत्वपूर्ण बैठकीला हजर राहून १२ तारखेच्या महा पदयात्रेत मातंग समाजाने जास्तीत जास्त संख्येने हजर व्हावे असे जाहीर आवाहन करण्यात आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०२५

## मिलमिली नदीवरील पुलाचे संरक्षक कठडे गायब

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**नेर :** शहरातून वाहणारी व पुढे नेर ते बाभुळगाव रस्ता पार करून पाथ्रड गोळे येथील धरणात सामावणारी मिलमिली नदीवर विषेशतः पावसाळ्यात वाहतुकीसाठी अडथळा होवू नये म्हणून मोठा पुल बांधण्यात आला आहे. साधारणपणे नदी पात्रापासून पुलाची उंची दहा ते पंधरा फूट आहे. सध्याच्या परिस्थितीत ह्या पुलावरील संरक्षक कठड्याला बसवलेले लोखंडी पाईप एका नंतर एक सर्वच गायब झालेले आहेत. या पुलावरून नेर ते बाभुळगाव अशी मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. शाळकरी विद्यार्थी एसटी व खाजगी वाहनाने मोठ्या प्रमाणात शहरात येतात. सोबतच मालवाहू गाड्यांची वर्दळ असते. पुलाच्या अलीकडे व पलीकडे मोठ्या प्रमाणात रस्ता खड्डेमय असल्याने व नेमका वळणाचा रस्ता आहे. त्यामुळे पुलाला संरक्षक पाईप नसल्याने मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

# यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँक घोटाळा? अधिवेशनात गाजला

प्रतिनिधी ११ डिसेंबर

■ **यवतमाळ :** यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत (YDCC Bank) तब्बल शंभर कोटींहून अधिक आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप विधानसभेत घुमला. हिवाळी अधिवेशनातील कामकाजादरम्यान आमदार बाळासाहेब मागुळकर यांनी हा मुद्दा जोरदारपणे उपस्थित करत सरकारकडून तातडीने एसआयटी स्थापन करण्याची आणि संपूर्ण संचालक मंडळ बरखास्त करण्याची मागणी केली.

### हिवाळी अधिवेशनात आ. मागुळकरांनी विचारला सरकारला जाब






आ. बाळासाहेब मांगुळकर यांनी सभागृहाचे लक्ष वेधताना सांगितले की जिल्ह्यातील जवळा, फुलसावंगी, जांब बाजार, पुसद, दिग्रस आणि आर्णी शाखांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाली आहे. "शेतकरी, सभासद आणि ग्राहकांचा विश्वास डळमळीत झाला आहे. बँकेची आर्थिक स्थिती अतिशय बिकट झाली असून, गैरव्यवहाराचा आकडा १०० कोटींच्या पुढे गेल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे," असे ते म्हणाले. बँकेने विविध योजना आणि अनुदानांतून आलेली रक्कम ठेवीदारांना परत करण्याऐवजी तीच रक्कम व्याजावर देण्याचा 'उपक्रम' राबवला. त्यानंतर तो पैसा पुन्हा ठेवीच्या स्वरूपात खात्यात दाखल करण्यात आल्याचे उघड झाले. "ही प्रकारे बँकच सावकारासारखी वागत होती," अशी टीका आमदार मांगुळकर यांनी केली. विशेषतः पुसद विभागात तब्बल १८ कोटींचा आर्थिक गोंधळ उघडकीस आल्याचे त्यांनी सांगितले. "बँकेतील कारभार पूर्णपणे अनियंत्रित झाला आहे. शेतकऱ्यांना मिळाले पाहिजेत ते कर्ज, अनुदान किंवा योजनांची रक्कम वेळेत मिळत नाही. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो," असा आरोप त्यांनी सभागृहात मांडला.

### विशेष पथकाकडून चौकशीची मागणी

■ "या सर्व व्यवहारांची तपासणी नियमित लेखापरीक्षणाने होणे अशक्य आहे. म्हणूनच स्वतंत्र विशेष पथकाची चौकशी किंवा SIT नेमून संपूर्ण घोटाळा पायापासून उकरून काढावा," अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली. तसेच सद्य संचालक मंडळाने नैतिक जबाबदारी स्वीकारून तत्काळ पायउतार व्हावे, अशीही मागणी केली. सभागृहात हा मुद्दा उपस्थित होताच जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रातील गोंधळ पुन्हा चर्चेत आला आहे. शेतकरी आणि सभासदांत तीव्र नाराजी असून सरकारकडून पुढील निर्णयाची प्रतीक्षा आहे.

### बोगस पदभरती आणि 'अनुकंपा'वर सीईओ?

■ बँकेतील बोगस पदभरतीचे प्रकरणही गंभीर असल्याचे मागुळकर यांनी नमूद केले. "योग्य प्रक्रिया न पाळता नियुक्त्या करण्यात आल्या. त्याहूनही गंभीर म्हणजे सीईओची नियुक्ती थेट अनुकंपावर! हे नेमके कोणत्या नियमात बसते?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## टिपरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

प्रतिनिधी ११ डिसेंबर



मृतक : तर्जपाल दौलत डबले

### एक जण जखमी; अंतरगाव येथील घटना

**कळंब :** मेटीखेडा- राळेगाव रोडवरील अंतरगावजवळ टिपरने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार ठार झाला. तर एक जण जखमी झाला असून, त्याच्यावर यवतमाळ येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहे. ही घटना काल १० डिसेंबर २०२५ दुपारी साडे तीन-चार वाजताच्या सुमारास घडली.

तर्जपाल दौलत डबले (३६) असे मृतकाचे नाव आहे. तर प्रथमेश भगवान येलकर (२७) असे गंभीर जखमीचे नाव आहे. ते दोघेही डोंगर खर्डा येथून मेटीखेड्याकडे जात असताना गिट्टीने भरलेल्या टिपर (एमएच 29 सीएम 0356) ने मोटरसायकलला मागून जोरदार धडक दिली. धडक इतकी जबरदस्त होती की मृतकास मोटरसायकलसह अंदाजे ४० फूट ओढत नेले गेले. तर्जपाल डबले हे नुकतेच भारतीय पोस्ट सेवेत रुजू झाले होते.

अपघाताची माहिती मिळताच वडगाव (जंगल) पोलिस स्टेशनचे एपीआय विकास दांडे व कळंब पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेश कुमार घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी यवतमाळ शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला, तर जखमी प्रथमेश येलकर यालाही शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सदर भागातील सिमेंट रोडचे काम यवतमाळ येथील कन्स्ट्रक्शन कंपनीतर्फे सुरू असून, गिट्टी-मुरूम वाहतूक निष्काळजीपणे चालवली जात असल्याचे नागरिकांचे आरोप आहेत. या वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कंपनीवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## प्रधानमंत्री धनधान्य योजनेमार्फत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार

प्रतिनिधी ११ डिसेंबर



**यवतमाळ :** प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेअंतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील आराखड्याचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय नोडल अधिकारी मुथू कृष्णन शंकर नारायण यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल भवन येथे दिनांक 9 डिसेंबर रोजी बैठक पार पडली. या बैठकीत केंद्रीय नोडल अधिकारी मुथू कृष्णन शंकर नारायण यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याबाबत महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

बैठकीत जिल्ह्यातील कृषी उत्पादनक्षमता वाढविणे, पिकांचे विविधीकरण, शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार, बँकेमार्फत कर्जपुरवठ्याची सुलभता, शाश्वत सिंचन सुविधा निर्माण करणे, काढणी नंतर तंत्रज्ञानाचे व्यवस्थापन, गोडाऊन क्षमता वाढविणे तसेच प्राथमिक प्रक्रिया केंद्र उभारणी यांसारख्या विविध घटकांचा आढावा घेतला गेला.

जिल्हाधिकारी विकास मीना यांनी सांगितले की, जिल्हा आराखडा तयार करताना शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी तसेच महिला बचत गट यांना केंद्रस्थानी ठेवून योजना राबवाव्यात. प्रधानमंत्री धनधान्य योजना विविध विभागांच्या अभिसरण तत्वावर राबविली जाणार असून प्रत्येक विभागाला भौतिक आणि आर्थिक लक्षांक देण्यात येईल. त्या अनुषंगाने योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले आहेत.

बैठकीस जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व प्रकल्प संचालक (आत्मा) संतोष डाबरे, जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण, विभागीय संशोधन केंद्राचे डॉ. अमर शेट्टीवार, अग्रणी बँकेचे व्यवस्थापक, कृषी विज्ञान केंद्र, सांगवी रेल्वेचे प्रमुख शास्त्रज्ञ आणि विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## डॉ. मिर्झा यांना अभिवादनासाठी शनिवारी श्रद्धांजली सभा

प्रतिनिधी ११ डिसेंबर



**यवतमाळ :** 'हास्य सम्राट ', 'मिर्झा एक्सप्रेस ' डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचे 28 नोव्हेंबरला निधन झाले. शनिवार दिनांक १३ डिसेंबरला त्यांना अभिवादन करण्यासाठी श्री. फकीरजी महाराज संस्थान धनज माणिकवाडा येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.त्यांच्या चाहत्यांनी श्रद्धांजली सभेला उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे

धनज माणिकवाडा हे डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचे पितृक गाव आहे.शनिवार दिनांक 13 डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता ही श्रद्धांजली सभा होणार आहे. डॉ.मिर्झा यांच्यावर प्रेम करणाऱ्या पंचक्रोशीतील सर्व श्रोत्यांनी, रसिकांनी मोठ्या संख्येने या श्रद्धांजली सभेला उपस्थित राहावे,असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

गेल्या 50 वर्षांपासून विविध विचारपीठांवरून ,कवी संमेलनातून, तीन पिढ्यांचे मनोरंजन व प्रबोधन करणारे डॉ. मिर्झा यांचे वयाच्या 68 व्या वर्षी 28 नोव्हेंबरला दीर्घ आजाराने निधन झाले.

विदर्भ, मराठवाडा व महाराष्ट्रातील त्यांच्या अनेक चाहत्यांना त्यांच्या प्रति आपल्या संवेदना व्यक्त करता याव्यात यासाठी डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांच्यावर प्रेम करणाऱ्या त्यांच्या मित्र मंडळांनी हे आयोजन केले आहे. शनिवारी सायंकाळी ४ वाजता या कार्यक्रमाला सुरुवात होईल.

त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करणे, काव्य श्रद्धांजली व्यक्त करणे, कुटुंबाच्या सदस्यांची भेट घेणे व मान्यवरांकडून श्रद्धांजली अर्पण करणे, असे या श्रद्धांजली सभेचे स्वरूप आहे. रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ.मिर्झा रफी अहमद बेग मित्र मंडळाने केले आहे.

## अवैध वाळू उत्खननावर धाड; दोन पोकलेन मशीन जप्त

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**मारेगाव :** तालुक्यातील कोसारा येथील वर्धा नदीपात्रात मध्यरात्री होणाऱ्या अवैध वाळू उत्खननावर महसूल विभागाने मोठी कारवाई करत दोन पोकलेन मशीन जप्त केली.

भद्रावती तालुक्यातील वाळूमाफिया काही स्थानिकांच्या मदतीने रात्रीच्या वेळी मशीनद्वारे मोठ्या प्रमाणात वाळू उपसा करीत असल्याची खात्रीशीर माहिती प्रशासनाला मिळताच तहसीलदार उत्तम निलावाड यांनी तत्काळ पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पथकाने कोसारा शिवारातील नदीपात्रात पोहोचताच दोन पिवळ्या रंगांच्या पोकलेन मशीनद्वारे सुरू असलेले अवैध उत्खनन उघडकीस आले. अधिकाऱ्यांनी मशीनचालकांना गौण खनिज उत्खननाचा परवाना मागितला असता कोणताही परवाना न सापडल्याने दोन्ही मशीन तात्काळ जप्त करण्यात आली. जप्त केलेली पोकलेन मशीन तहसील कार्यालयाच्या पटांगणात लावण्यात आली आहेत. ही कारवाई जिल्हाधिकारी विकास मिना, उपविभागीय अधिकारी नितीन हिंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार उत्तम निलावाड, तलाठी सनी कुळमेथे, प्रविण उपाध्ये, चिकनकर, सरनाईक, वाहनचालक विजय कन्नाके तसेच तिघा पोलिस कर्मचाऱ्यांच्या पथकाने केली. शासकीय नियमानुसार प्रत्येकी पोकलेनवर ७ लाख ५० हजार रुपये दंड, असा एकूण १५ लाख रुपयांचा दंड आकारला जाणार असल्याची माहिती तहसीलदार उत्तम निलावाड यांनी दिली. या कारवाईमुळे परिसरातील वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.



### बॉडी बिल्डिंग स्पर्धा

■ वणी - येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचालक लोकमान्य टिळक महाविद्यालयच्या मान्यता असलेल्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आंतरराष्ट्रीय महाविद्यालयीन सौष्ठव (मुले) 2025 स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत अनेक तरुण बॉडी बिल्डर सहभागी झाले. त्यांनी आपले शारीरिक कौशल्य, ताकद आणि तयारीची झलक प्रेक्षकांसमोर सादर केली. प्रतिस्पर्ध्यांनी विविध पोझेस आणि व्यायामाद्वारे आपल्या कष्टांचे फळ दाखविले, ज्यामुळे स्पर्धेला उत्साहवर्धक वातावरण लाभले. संपूर्ण स्पर्धा रंगतदार व प्रेक्षकांसाठी आकर्षक ठरली.

## १२ जानेवारीला भव्य रक्तदान शिबिर

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**यवतमाळ :** स्वामी विवेकानंद स्मारकाच्या भव्य अनावरण सोहळ्यानिमित्त तसेच राष्ट्रीय युवा दिन आणि माँ जिजाऊ जयंतीनिमित्त 12 जानेवारी रोजी सामका आयुर्वेद योग व वेलनेस सेंटर, गोधनी येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील युवकांनी या शिबिरात मोठ्या उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले असून रक्तदानाद्वारे समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. दरम्यान, रोटरी क्लब ऑफ आर्णीच्या वतीने जुन्या अर्बन बँक हाल व फुलो झानो शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या दोन्ही ठिकाणी एकूण 112 रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून मानवतावादी कार्यात मोलाची भर घातली. शिबिरासाठी यवतमाळ येथील शौर्य ब्लड सेंटरचे डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांनी आवश्यक वैद्यकीय सहाय्य पुरविले.

## प्रवीण काळे याची दिल्लीतील प्रजासत्ताक दिन परेडसाठी निवड

प्रतिनिधी ११ डिसेंबर

**यवतमाळ :** दारव्हा तालुक्यातील लोही या छोट्या गावातील प्रवीण राजू काळे यांची थेट दिल्लीतील प्रजासत्ताक दिन परेड 2026 साठी निवड झाली आहे. या निवडीमुळे लोही गावाचा राष्ट्रीय पातळीवर गौरव झाला आहे. प्रवीण काळे मुंबई मंत्रालयात स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत राजू काळे यांचे सुपुत्र आहेत.



भारताच्या कर्तव्य पथावर होणारी प्रजासत्ताक दिन परेड ही देशातील सर्वात प्रतिष्ठेची आणि सन्मानाची परेड मानली जाते. तिन्ही सैन्यदल, सुरक्षा पथक, राज्य व केंद्र शासनाच्या झाक्या, वायुसेनेचा फ्लाय-पास्ट, मोटारसायकल स्टंट आणि सांस्कृतिक सादरीकरण यांचा भव्य समावेश या परेडमध्ये असतो. विद्यार्थी आणि तरुणांसाठी ही परेड स्वप्नपूर्तीची सुवर्णसंधी ठरते.

लोही गावात निवडीची बातमी पसरताच जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. सरपंच संजय शिंदे, उपसरपंच राजू हळदे, माजी जि.प. सदस्य पंढरीनाथ सिंहे, माजी सभापती सुनिता राऊत, स्थानिक शिक्षकवृंद आणि ग्रामस्थांनी प्रवीण काळे यांचे कौतुक केले. प्रवीण यांनी आपल्या यशाचे श्रेय गुरुवर्य हरिश्चंद्र राठोड (डायरेक्टर, TDRF), NCC 62 महाराष्ट्र बटालियनचे कॅप्टन चेतन जाधव आणि 2025 परेडसाठी निवडलेले बादल राठोड यांना दिले. तसेच आई वंदना आणि वडील राजू काळे यांचा प्रेरणा व पाठिंबा त्यांच्या यशाची मुख्य कडी ठरली. विद्या भारती महाविद्यालय, अमरावतीतील प्रवीण यांचे सहाध्यापक व सहविद्यार्थ्यांचा पाठिंबा देखील मिळाला असून, ही निवड केवळ लोही गावाची नव्हे, तर संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरली आहे.

## अरे बापरे! : 33 फूट उंच अन् 210 टन वजनाचे शिवलिंग

प्रतिनिधी ११ डिसेंबर

### महाबलीपुरमचे विशाल शिवलिंग चंपारणकडे रवाना; पाटणबोरीत दर्शनासाठी भक्तांची गर्दी

**यवतमाळ :** महाबलीपुरम, तामिळनाडूमधून चंपारण, बिहारकडे नेण्यात येत असलेले 210 टन वजनाचे शिवलिंग ही ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्वाची घटना ठरत आहे. या शिवलिंगाची यात्रा 21 नोव्हेंबरपासून सुरू असून, आतापर्यंत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 44 वर बाराशे किलोमीटर अंतर पार केले गेले आहे. शिवलिंगाचा प्रवास हैदराबाद, नागपूर, जबलपूर, सतना, मिर्झापूर, छपरा या मार्गाने होणार असून, अंतिम स्थानी कॅथवलियामधील विराट रामायण मंदिरात प्रतिष्ठापित केले जाणार आहे.



प्रवासासाठी स्पेशल परमिशन घेऊन 96 टायर असलेल्या दहा चाकांच्या ट्रकवर शिवलिंग नेले जात आहे. या शिवलिंगाच्या सुरक्षिततेसाठी जवळपास 14 जणांची टीम सतत कार्यरत आहे. दररोज फक्त 60–70 किलोमीटर अंतर कापले जात असून, चालक अरुण कुमार यांनी सांगितले की रस्त्यावर कोणतीही अडचण येऊ नये यासाठी काही ठिकाणी रस्त्याचा विस्तार केला गेला आहे. ग्रॅनाईटच्या एका दगडात तयार केलेले 33 फूट उंच आणि 210 टन वजनाचे हे शिवलिंग जगातील सर्वात उंच आणि विशाल मानले जाते. हे वजन जवळपास 50 हत्तींच्या बरोबरीचे आहे. शिवलिंगाच्या खालच्या भागात 14 ओळींमध्ये 72-72 लहान शिवलिंग बनवले आहेत, म्हणजे एकूण 1008 लहान शिवलिंगांचा समावेश आहे. प्रत्येक लहान शिवलिंगाची उंची सुमारे नऊ इंच आहे. हे शिवलिंग बनविण्यासाठी तीन कोटी रुपयांचा खर्च झाला असून, महिन्यांचे मेहनत आणि कुशल कारागिरी यात गुंतलेली आहे. बोरज सीमेवर पोहोचल्यावर परिसरातील शेकडो भाविकांनी दर्शन घेतले. पाटणबोरी RTO चेकपोस्टवर दर्शनासाठी एक तास थांबावे लागले, तर भक्तांची गर्दी इतकी मोठी होती की परिसर उत्सवासारखा सजला होता. स्थानिकांनी उत्सुकतेने या ऐतिहासिक आणि धार्मिक यात्रेला पाहिले, तसेच ट्रक चालक अरुण कुमार यांच्याशी संवाद साधून प्रवासाची माहिती घेतली. या यात्रेमुळे फक्त धार्मिक महत्त्वच नाही तर स्थानिकांमध्ये उत्साह आणि भक्तिभाव वाढला आहे. स्थानिक प्रशासनाने देखील सुरक्षितता आणि वाहतुकीसाठी विशेष व्यवस्था केली असून, या शिवलिंगाच्या प्रवासाची नोंद ऐतिहासिक ठरण्याची शक्यता आहे. भक्तांच्या भावनिक सहभागामुळे हा प्रवास केवळ धार्मिक उपक्रम नाही तर समाजात एकसंधता आणि श्रद्धेची ज्वाला पेटवणारा अनुभव ठरत आहे. शिवलिंगाची भव्य यात्रा अजून काही आठवड्यांपर्यंत सुरू राहणार असून, प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या भव्य धार्मिक उपक्रमामुळे पाटणबोरी व परिसराचा गौरवही राष्ट्रीय पातळीवर झळकला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि. ११ डिसेंबर २०२५

# निमंत्रण आंदोलन




## वाशीम शहरातील मुख्य रस्ते रातोरात हातोहात...

# मुख्यमंत्री साहेब रोजच या हो, शहरातील रस्ते करा हो!

## * सागर कोकास यांचा आर्त टाहो...

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

**विकासाच्या नावावर हजारो कोटीचे कामे करूनही शहर भकास झाले आहे. नागरिकांना मुलभूत समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे. शहरवासीयांना विविध समस्यांना तोंड घ्यावे लागत आहेत. शिवाय शहरातील रस्तेही १२ वर्षात ५ वेळा होवूनही रस्तेच नव्हे तर नागरिकांचे जीवनच खड्ड्यात गेले आहे. तुम्ही निवडणूक प्रचारासाठी येत असल्यामुळे शहरातील रस्ते तातपूर्ते का होईना रातोरात हातोहात दुरूस्त झाले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री साहेब रोजच या हो वाशीम शहराचा विकास करा हो असा आर्त टाहो आमआदमी पार्टीचे उमेदवार सागर कोकास यांनी आंदोलन करून केला होते. या संबंधिचे सर्वप्रथम मुख्यमंत्री साहेब, तुमच्या मुळे तातपुरर्ते रस्ते दुरूस्त असे वृत्त लावून सिटी न्युज सुपरफास्टने सर्वप्रथम लक्ष वेधले. सागर कोकासच्या आंदोलनाला यश आले असून सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्ताची दखल घेत मुख्यमंत्री गेल्यानंतरही शहरातील मुख्यमार्गाचे काम सुरू झाले होते. मात्र, अद्यापही शहरातील काही मुख्य रस्ते खड्ड्यातच गेले आहेत त्यामुळे सागर कोकास यांनी शहरातील पाटणी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, मन्नासिंग चौक व इतर रस्त्यावर उतरूण खड्ड्यात मुख्यमंत्र्यांना आमंत्रण देवून आंदोलन केले.**




दि २८ नोव्हेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री शहरात येणार म्हणून, प्रशासनाने नियोजित मार्गावरील खड्डे तासाभरात बुजविले, जागोजागी स्वच्छता केली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात गेल्या कित्येक महिन्यांपासून असलेली समस्या १० मिनीटांत मार्गी लावली, ह्या सर्व बाबी पाहून आम आदमी पार्टीचे वाशिम नगर परिषद नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सागर कोकास हे व्यथित झाले. त्यामुळे सागर कोकास यांनी 'मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या' असे पोस्टर हाती घेऊन, वाशिम करांना होणाऱ्या त्रासाची बाब अधोरेखीत केली. शहराच्या रस्त्याविषयी फक्त सिटी न्युज सुपरफास्टने शेकडो वृत्ताची वृत्त मालिका चालविली.

मुख्यमंत्री येणार त्या दिवशीच मुख्यमंत्री साहेब तातपूर्ती का होईना रस्ते दुरूस्त, प्रशासन सुस्त, नागरिक त्रस्त या आशयाचे वृत्त प्रकाशित केले होते. आणि विविध समस्यांची जाणीव करून दिली. त्यानंतर सागर कोकास यांनी रस्त्यावर उतरून अभिनोव आंदोलन केले. मुख्यमंत्री साहेब रोजच या हो वाशीम शहराचा विकास करा हो असा आर्त टाहो काढला. त्यामुळे आता निवडणुकीच्या तोंडावर दिखावा म्हणून वाशीम शहरातील कामे तातपुरर्ते का होईना सुरू झाले आहेत. पुसद नाका चौकातील काम, राजेंद्र प्रसाद शाळेमागील काम, बाकलीवाल शाळेसमोरील काम, अशा अनेक रस्त्याचे काम सागर कोकास यांच्या आंदोलनामुळे सुरू झाल्याची चर्चा आहे. मात्र पुन्हा शहरातील सर्वच रस्ते दुरूस्त करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना निमंत्रण देवून पुन्हा खड्ड्याच्या रस्त्यावर या तुम्हच्या मुळे का होईना रस्ते दुरूस्त होतील असे सागर कोकास यांनी आंदोलन केले.

वाशिम नगर परिषद निवडणुकीच्या तोंडावर वाशिम शहराचा विकास प्रत्येक राजकीय पक्षांकडून केल्या जातो. मात्र, शहरात रस्त्यावर पडलेले खड्डे, सांडपाण्याचे व्यवस्थापन, पिण्याचे पाणी, टेंपल गार्डनची झालेली दुरावस्था, रखडलेले नाट्यगृह, बंद असलेले पथदिवे, मुख्य शहरात रस्ता नाही, पण जिथे घर नाही अशा भागात सिमेंटचे रस्ते अशा एक नाही, अनेक समस्या वाशिम शहरात आ वासून उभ्या आहेत.

२८ नोव्हेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वाशिम शहरात आले होते. त्यांनी शहर विकासाची आश्वासने दिली. मात्र, वाशिमकर नागरिक दररोज कुठल्या परिस्थितीत जीवन जगतोय, याची त्यांना कल्पनाच नाही. त्यामुळे आम आदमी पार्टीचे वाशिम नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सागर कोकस यांनी 'मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या' असे आवाहन करणारे पोस्टर दाखविले. कारण, गेल्या कित्येक वर्षांपासून रस्त्यावरील खड्डे जसेच्या तसेच आहेत, पिण्याचे पाणी वेळेवर मिळत नाही, जागोजागी कचऱ्याचे ढिग साचले, बंद अवस्थेत असलेले पथदिवे आदि समस्यांचा वाशिमकर दररोज सामना करीत आहेत. मात्र, मुख्यमंत्री शहरात येणार असल्यामुळे प्रशासनाने अगदी तासाभरात रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता तयार केला. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय रोज शहरात आले तर, वाशिमकरांना चांगल्या सुविधा तरी मिळतील, या अपेक्षेपोटी 'मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या' असे आवाहन केले.

सागर कोकास यांच्या या आवाहनाच्या शहरातील प्रत्येक मतदाराच्या तोंडी चर्चा सुरू होती. त्यानंतर शहरातील रखडलेल्या कामाला सुरूवात झाली आहे .




## 'सिटी न्युज सुपरफास्ट' चा सततचा पाठपुरावा...

सर्व सामान्यांच्या समस्यांसाठी सांध्य दैनिक सिटी न्युज सुपरफास्ट शासन दखल घेईपर्यंत सततचा पाठपुरावा करीत असते. त्यामुळेच १३ वर्षात लोकांच्या मनामनातून घराघरात सिटी न्युज सुपरफास्ट पोहोचला आहे. शहरातील विविध समस्यांच्या प्रत्येक विषयांच्या हजारो वृत्त मालिकेची शृंखला सिटी न्युज सुपरफास्टने लावून धरली आहे. शहरातील समस्यांसाठी सदैव प्रथम पुढाकार घेवून समस्या मार्गी लागेपर्यंत शेकडो वृत्तातून वृत्त मालिकेच्या माध्यमातून सततचा पाठपुरावा करीत असल्याने सिटी न्युज सुपरफास्टने जनसामान्यांच्या मनात घराघरात स्थान निर्माण केले आहे. त्याचाच परिणाम म्हणून समस्यांच्या वृत्तांच्या कात्रनाचे बॅनर शहरात आंदोलनाच्या वेळी लागत असतात.




## समस्यांच्या गर्तेत जीवन जगताहेत वाशिमकर

२८ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री शहरात येणार म्हणून रस्त्यांची स्वच्छता झाली, रस्त्यावरील खड्डे बुजविले. मात्र, गेल्या कित्येक वर्षांपासून वाशिम शहारातील प्रत्येक नागरिक दररोज याच खड्ड्यांतून ये-जा करतोय, त्यांची हाडे दररोज खिळखिळी होताहेत. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय दररोज वाशिम ला आल्यास किमान येथील जनतेला चांगल्या सुविधा तरी मिळतील, अशी माफक अपेक्षा आपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सागर कोकास यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर तातपूर्ते का होईना आता निवडणुकीसाठी दिखावा म्हणून मुख्यरस्त्यावरील कामांना सुरूवात झाली आहे. मात्र, सागर कोकास यांच्या आंदोलनामुळेच हे कामे होत असल्याची चर्चा वाशीम शहराच्या मतदारामध्ये आहे.

## कागदोपत्री वृक्षारोपण रोपवाटीकेत नाहीत वृक्ष, भ्रष्टाचारी आहेत दक्ष, जिल्हाधिकाऱ्यांनी द्यावे लक्ष !

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

रोजगार हमीच्या १०० कोटीच्या घोटाळ्यानंतरही मालेगाव तालुक्यातील घोटाळ्याचे सत्र थांबता थांबेना तालुक्यात रोजगार हमी अंतर्गत देण्यात आलेल्या रोपवाटीकाच कागदोपत्री असल्याचे सिध्द झाले आहे. रोपवाटीकेतील वृक्ष गायब असून त्यानंतर रोपवाटीकेतील वृक्षांवर राबविण्यात येणारी वृक्षारोपण योजना कुठे आहे साहेब असा प्रश्न पडला आहे. भ्रष्टाचारी दक्ष असले तरी त्यांनी काहीच न करता ४५ लक्ष रूपये काढल्याचा प्रकार समोर आला आहे.



वाशीम तालुक्यात कागदोपत्री रोपवाटीका व न झालेल्या वृक्षारोपणवर कोट्यवधीचा घोटाळा सिटी न्युज सुपरफास्टने उघड केला होता. आता मालेगाव तालुक्यात अस्तित्वात नसलेल्या चार रोपवाटिकांचे कुशलचे देयक काढण्यात आले असल्याचे माहिती आहे, सदर रोपवाटिका ह्या एसआयटी (विशेष चौकशी समिती) चौकशीत समाविष्ट होत्या, चौकशीने केलेल्या चौकशीमध्ये काही गंभीर बाबी समोर आल्याने सदर रोपवाटिकांचे देयक हे सन २०१८ पासून प्रलंबित होते, मात्र रोजगार हमी योजनेच्या घोटाळ्यात माहीर असलेल्या पंचायत समिती मालेगाव यांना यातूनही पर्याय काढून अस्तित्वात नसलेल्या व यासाठी चौकशीतगंभीर बाबी समोर आलेल्या रोपवाटिकांचे सुमारे ४५ लक्ष रुपये देयक काढले आहे, यामध्ये 'अर्ध्यात आम्ही अर्ध्यात तुम्ही' अशी डील झाल्याची माहिती समोर येत आहे, सदर डील ही रोहयो विभाग प.स.मालेगाव मधील 'दीपक' ने केल्याचे सिद्ध होत आहे, दीपक ने सदर प्रकरणात अर्थपूर्ण 'सावळा' गोंधळ घातल्याचे पुरावे सिटी न्यूज कडे आहेत, याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण चौकशीचे आदेश देऊन सदर घोटाळा बाहेर काढावा आणि दीपक चे कॉल डिटेल्स काढावे व चौकशी मद्ये दोषी आढलून येणाऱ्या बिडीओ व सीडीओ यांना तत्काळ निंलबित करावे अशी जनतेतून मागणी होत आहे.

### वाशीमनंतर मालेगावच्या रोपवाटीका गायब...

मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने रोजगार हमी योजनेअंतर्गत वाशीम तालुक्यात १४ रोपवाटीका कागदोपत्री असल्याचे प्रकरण सिटी न्युज सुपरफास्टने २०२२ मध्ये वृत्त मालिका प्रकाशित करून उघड केले होते. या भ्रष्टअधिकाऱ्याने चौकशी मॅनेज केली होती. जिओ टॅगवर रोपवाटीकेत एकही वृक्ष नसल्याचे पुरावे सिटी न्युज सुपरफास्टकडे उपलब्ध आहे. त्यानंतर यामधील भ्रष्ट तांत्रीक अधिकाऱ्याला लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी लाच स्वीकारतांना अटक केली. यावरून रोपवाटीकेसह इतरही विभागात भ्रष्टाचार झाल्याचे सिध्द झाले. मालेगाव तालुक्यातही रोपवाटीका गायब झाल्याचा प्रकार उघडकिस आला आहे .रोपवाटीकेतीच वृक्ष गायब झाल्याने वृक्षारोपण कुठे झाले साहेब असा सवाल नागरिक करीत आहेत.

# विधीमंडळाच्या अधिवेशनात शिक्षणाच्या प्रश्नाला बगल !

## * शिक्षणाच्या प्रश्नांबाबत सरकार गंभीर नाही * स्वतंत्र अधिवेशन घेण्याची शिक्षण बचाव समन्वय समितीची मागणी

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

नागपुर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात शिक्षणाच्या बाबतीत मुलभूत प्रश्नांवर चर्चा न झाल्याने तसेच शिक्षणाच्या गंभीर समस्यांकडे लोकप्रतिनिधींनी कानाडोळा केला असल्याने सरकार या प्रश्नावर गंभीर नसल्याची टिका शिक्षण बचाव समन्वय समितीचे राज्य समन्वयक रमेश बिजेकर यांनी केली आहे. या पार्श्वभूमिवर शिक्षणाच्या प्रश्नावर स्वतंत्र अधिवेशन बोलावण्याची मागणी विदर्भस्तरीय शिक्षण बचाव समन्वय समितीने दि. १० डिसेंबर रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रकाद्वारे केली आहे.



याबाबत दिलेल्या प्रसिध्दी पत्रकानुसार, सालाबादाप्रमाणे यंदाही महाराष्ट्र विधिमंडळाचे अधिवेशन दि. ८ डिसेंबर पासुन सुरु झाले आहे. नागपुर कराराप्रमाणे अधिवेशन भरविण्याची केवळ औपचारिकता पार पाडली जात आहे. खरेतर जनतेच्या रोजच्या जगण्याचे प्रश्न चर्चेत घेवून त्याची सोडवणुक व्हावी, यातुन जनतेच्या हिताची अंमलबजावणी व्हावी ही रास्त अपेक्षा असते. या कसोटीवर आतापर्यंतची अधिवेशने खरी ठरली आहेत, असे खात्रीपुर्वक सांगता येत नाही. तरीही सरकारची महत्वाची कृती म्हणून त्याकडे बघावे लागते. या अधिवेशनात सरकारच्या वतीने १८ विधेयके, ४७ तारांकित प्रश्न, ३६ अतारांकित प्रश्न व २५ लक्षवेधी प्रश्न मांडले जाणार असल्याचे आहेत. या प्रश्नांचे वर्गिकरण केल्यास व्यवस्थेच्या लक्षणांचीच चर्चा प्रभावी असल्याचे दिसते. खुन, बलात्कार, शेतकयांची नुकसान भरपाई, चोरी, प्रदुषण, अंमली पदार्थ अशाच प्रश्नांची चर्चा अधिक आहे. या प्रश्नांना कमी लेखण्याचे काही कारण नाही, परंतु अत्यंत महत्वाचे प्रश्न विधीमंडळाच्या पटलावर न येणे महाराष्ट्राची चिंता वाढवणारे आहे. तारांकित, अतारांकित व लक्षवेधी या सगळ्या प्रश्नांची एकुण संख्या १०८ आहे. एकुण १०८ प्रश्नांपैकी केवळ ४ प्रश्न शिक्षणांशी संबंधित आहेत. शिक्षणावर केवळ ३.७ टक्के प्रश्न विचारले जाणार आहेत. सत्ताधारी व विरोधी राजकीय पक्षांची शिक्षणाशी बांधिलकी किती हे यातुन स्पष्ट होते. ४ प्रश्नांपैकी एक प्रश्न मुंबई महानगर पालिकेच्या शाळांच्या खाजगीकरण करण्यासंबंधी आहे. दुसरा प्रश्न शाळेतील सुविधा संबंधी ज्यात भारत व राज्य सरकारकडुन डीजीटल योजनांची घोषणा करण्यात आली होती. त्याचीही अंमलबजावणी झाली नाही. उलट ४४३३० शाळांमध्ये वीजेचा पुरवठा नाही. या शाळांना विजपुरवठा करण्यात आला नाही, आणि वीजपुरवठा नसलेल्या शाळांच्या संख्येत ७४२ शाळांची भर पडलेली आहे. याची विचारणा करणारा हा प्रश्न आहे. तिसरा प्रश्न वैद्यकीय शिक्षणाचा आहे. वैद्यकीय शिक्षणात जास्त फी आकारण्यासंबंधी प्रश्न विधिमंडळाच्या पटलावर मांडला जाणार आहे. चौथा प्रश्न दहावीच्या भूगोलाच्या व इंग्रजी माध्यमाच्या विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकातील चुका निदर्शनात आणुन देणारा आहे. हे सर्व प्रश्न मूलभूत प्रश्न नाहीत. शिक्षण व्यवस्थेत सुधारणेचे प्रश्न आहेत. शिक्षणाचे बाजारिकरण, स्तरिकरण, शाळाबंदी, एकसुरी व कालबाह्य शिक्षण आशय या मूलभूत प्रश्नांकडे सर्व पक्षीय आमदारांचे दुर्लक्ष आहे. ही फार मोठी शोकांतिका आहे. शिक्षक आमदारांचेही याकडे सोयीस्कर दुर्लक्ष आहे. शाळा संकुलमुळे अवघ्या ५ वर्षात भारतातील ८ लाख पन्नास हजार विद्यार्थ्यांचे प्राथमिक शिक्षण बंद झाले. यात मुलींचे प्रमाण जास्त आहे. महाराष्ट्रातील ३० हजार ७५४ विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद झाले. त्यातील १५ हजार ३५७ किशोरवयीन मुलींचे शिक्षण बंद झाले आहे.

सरासरी १६०० शाळा बंद झाल्याचे अनुमान काढता येते. गावची शाळा बंद झाल्याने ६ ते १४ वयातील मुलांचीच शिक्षण बंदी होणार नाही, तर त्यांच्या पुढच्या पिढ्यांची शिक्षणबंदी होणार आहे. यातून शिक्षणबंदीचे पुन:ऊत्पादन घडवले जाईल. हा अत्यंत गंभीर प्रश्न आमदारांना महत्वाचा का वाटत नाही असा प्रश्न या प्रसिध्दी प्रत्रकातुन शिक्षण बचाव समन्वय समितीने उपस्थित केला आहे. शिक्षण हा विषय समवर्ती सूची मध्ये आहे. राज्याला स्वत:चे शिक्षण धोरण आखण्याचे, नियंत्रण व संचालन करण्याचे अधिकार संविधानाच्या २४६ कलम व सूची ७ प्रमाणे दिले आहेत. परंतू महाराष्ट् सरकारने भारत सरकार पुढे शरणागती पत्करुन राष्ट्रीय शिक्षण धोरण महाराष्ट्रात लागू केले आहे. १३ कोटी महाराष्ट्राच्या जनतेची अस्मिता सरकारने गहाण ठेवली आहे. महाराष्ट्रात धोरण लागू करताना महाराष्ट्राच्या विधिमंडळात याची चर्चा झाली नाही. सरकारला चर्चा नको होती, विरोधकांचे काय ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाने शिक्षणबंदी घडवली जात आहे. याविषयीचा प्रश्न विधिमंडळात का उपस्थित केला जात नाही असा सवालही शिक्षण बचाव समन्वय समितीने केला आहे.

शिक्षणात उभे झालेले गंभीर प्रश्न लक्षात घेता शिक्षणावर स्वतंत्र अधिवेशन बोलवले गेले पाहिजे. राष्ट्रीय शिक्षण धोरण, बाजारीकरणाचे परिणाम, शाळाबंदी, सरकारी शाळांची घटती पटसंख्या, शिक्षकांची पदभरती, टिईटी, अशैक्षणिक काम, शिक्षण हक्क कायद्याच्या निकषांची पुर्तता न होणे, उच्च शिक्षणाचे संकुचितीकरण व स्तरिकरण, घटती आर्थिक तरतुद, शाळांच्या असुविधा, शिक्षणातील एकसुरी शिक्षण आशय या विषयाची चर्चा विधीमंळात होण्याची मागणी शिक्षण बचाव समन्वय समितीच्या विदर्भस्तरीय पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

या पत्रकावर समितीचे अध्यक्ष मंडळाचे समन्वयक प्रभाकर गेडाम, सचिव मंडळाचे समन्वयक मंगेश भूताडे तसेच सदस्य गजानान धामणे, सुषमा भड,अतुल सतदेवे, वसंत गवळी, रेणुकादास उबाळे, संजय लेनगुरे, धर्मानंद मेश्राम, संतोष सुरडकर, भास्कर मून यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट
गुरूवार, दि.११ डिसेंबर २०२५
http://epaper.citynewssuperfast.com

# उच्चभ्रू प्रभागातही समस्या कायम
# राम नगरात रस्त्यावर खड्डेच खड्डे

शहराच्या प्रभाग क्रमांक पाचची ओळख 'सुखवस्तू' आणि 'पांढरपेशा' नागरिकांचा परिसर म्हणून आहे. म्हाडा कॉलनी, रुंदावन नगर, स्टेट बँक कॉलनी, लहान उमरी, खेडकर नगर, मोरेश्वर कॉलनी, गजानन पेठ, राऊतवाडी, रणपिसे नगर, सुधीर कॉलनी आणि चतुर्भुज कॉलनी अशा उच्चभ्रू वस्तींचा यात समावेश आहे. हा प्रभाग केवळ नोकरदार आणि व्यावसायिकांचे केंद्र नाही, तर शहरातील मोठी हॉस्पिटल्स आणि कोचिंग क्लासेसची रेलचेल याच भागात आहे. त्यामुळे बाहेरगावाहून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची येथे मोठी गर्दी असते. इतकेच नाही तर या प्रभागात आमदार आणि खासदारांबरोबर दोन माजी महापौर राहतात. त्यामुळे या प्रभागाचा सर्वाधिक विकास झाला असून संपुर्ण शहर या प्रभागाप्रमाणे झाल्यास इतर प्रभागांच्या समस्या मार्गी लागतील.




हा प्रभाग भारतीय जनता पक्षाचा पारंपरिक बालेकिल्ला मानला जातो. २०१७ च्या निवडणुकीत भाजपने येथे जोरदार मुसंडी मारत चारही जागांवर विजय मिळवला होता. माजी महापौर विजय अग्रवाल, सुभाष खंडारे, अर्चना मसने, रश्मी अवचार यांनी येथून प्रतिनिधीत्व केले आहे. ॲड. गिरीष गोखले प्रभाग ५ मधून इच्छूक उमेदवार असून त्यांना कुठल्या पक्षाचे तिकीट मिळेल हे पाहायचे. प्रभागात काही अडचण आली की ती अडचण ते विकास काम मार्गी लावण्याचा प्रयत्नात आमदार आणि माजी महापौर अग्रेसर असतात. त्यामुळे या प्रभागाच्या विकासाचा रथ सुसाट पळत आहे. कंत्राटदारांच्या चुकीमुळे राम नगर चा मुख्य रस्त्यावर आता खड्डेच खड्डे झाले आहे ते दूरुस्त करण्याची गरज वर्तवली जात आहे. प्रभागात काही ठिकाणी रस्त्यांपेक्षा नाल्या उंच बांधल्या गेल्या आहेत. त्यामुळे पावसाळयात नाल्यांचे पाणी थेट रस्त्यावर साचण्याचा प्रकार नियमितपणे घडतो.

इच्छूक उमेदवार



विजय अग्रवाल | अर्चना मसने | रश्मी अवचार | सुभाष खंडारे | गिरीष गोखले

सध्याच्या निवडणुकीत, प्रभागातील चारही विद्यमान नगरसेवक पुन्हा एकदा विकासाच्या नावावरच मते मागणार हे निश्चित आहे. त्यांनी अनेक मोठी कामे पूर्ण केली असली तरी, रस्ते, नाले आणि स्वच्छतेची रखडलेली कामे त्यांच्यासाठी मोठे आव्हान बनू शकतात. अर्धवट राहिलेल्या कामांमुळे नगरसेवकांना मतदारांच्या रोषाचा आणि नाराजीचा सामना करावा लागणार, हे मात्र निश्चित. त्यामुळे सुखवस्तू वस्तीतील हे मतदार विकासाच्या अपूर्ण आश्वासनांवर कसा निर्णय घेतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

अर्धा भाग हा उच्चभ्रू लोकवस्तीत गणला जातो तर लहान उमरी सारखा परिसरात निम्न मध्यमवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची संख्या अधिक आहे. गेल्या काही वर्षांमध्ये प्रभाग ५ मध्ये सिमेंट रस्ते, सर्व्हीस लाईनची कामे, नाल्यांची बांधकाम अशी मेहत्वाची कामे झालीत. मात्र, उच्चभ्रू वस्तीतील विकास कामांच्या तुलनेत प्रभागातील काही भाग आजही मुलभूत सुविधांपासून मागे आहे. लहान उमरीसारख्या भागात पावसाचे पाणी घरामध्ये शिरते, तर काही भागात उघड्यावरील कचऱ्याची मोठी समस्या आहे, अशा नागरिकांच्या तक्रारी आहेत. प्रभाग पाच हा लोकसंख्या व क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठा आहे.

पावसाळयात घरांना पाण्याचा वेढा प्रभागातील लहान उमरीचा काही भाग दलीत वस्तीत येतो. आनंद नगर, सिद्धार्थ नगर अशा भागात कचरा सर्रास उघड्यावर टाकला जातो. पावसाळयात घरांच्या भोवती पाण्याचा वेढा असतो. सखल भागातील घरांमध्ये पावसाचे पाणी शिरते. या भागांमध्ये रस्ते झालेत, पण नाल्या नाहीत, सफाई होत नाही अशी परिस्थिती आहे.

२०१७ च्या निवडणुकीतील चित्र महानगरपालिकेच्या २०१७ साली झालेल्या निवडणुकीत प्रभाग ५ मधील मतदारांनी भारतीय जनता पार्टीच्या चारही उमेदवारांना विजयी केले होते. प्रभाग ५ 'अ'मध्ये भाजपचे सुभाष जोतीराम खंडारे (मते ५४३०), 'ब'मध्ये अर्चना जयंत मसने (६२७४), 'क'मध्ये रश्मी प्रशांत अवचार (५५९५), व विजय कमलकिशोर अग्रवाल (५६०१) 'ड'मध्ये विजयी झाले होते. हा प्रभाग भारतीय जनता पार्टीचा गड मानला जातो. गेल्या निवडणुकीत भाजपच्या चारही जागावरील उमेदवारांना प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या जवळपास दुप्पट मते मिळाली होती. या प्रभागात भाजपमधील विद्यमान उमेदवारांसह इच्छुकही तिकिट मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत.


**प्रभाग क्र.५परिसर**

रामनगर, म्हाडा कॉलनी, अष्टविनायक नगर, वृंदावन नगर, दत्तवाडी, स्टेट बँक कॉलनी, लहान उमरी, खेडकर नगर, आनंद नगर, सिद्धार्थ नगर, मोरेर्श्वर कॉलनी, गजानन पेठ, रतनलाल प्लॉटचा काही भाग, राऊत वाडी, सावंतवाडी, रणपिसे नगर, रघुनंदन सोसायटी, जागृती विद्यालय परिसर, अनानखा प्लॉट, केला प्लॉट, सुधिर कॉलनी, चर्तुभूज कॉलनीचा काही भागाचा प्रभाग ५ मध्ये समावेश होतो.



**उघड्यावर कचरा**

म्हाडा कॉलनीतील रस्त्यासाठी १५ वर्षांपासून प्रलंबित मागणी आहे. रात्री कुत्र्यांचे टोळके फिरतात, मुलांना बाहेर पाठवायलाच भीती वाटते. पाण्याची समस्या मार्गी लागली आहे आता नियमित पाणी येते, अनेक भागात कचऱ्याची समस्या आहे. कचरा तसाच उघड्यावर पडून आहे. उमरी नाक्यावर उघड्यावर कचऱ्याचे ढीग, कचऱ्याची समस्या मार्गी लावावी अशी मागणी आहे.





इतर पक्षांचे बोलायचे झाल्यास युती-आघाडीचे काय समीकरण तयार होते, यावर इच्छुक उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे. राम नगर आणि लहान उमरीचा भाग असलेल्या प्रभाग पाच च्या आरक्षणात यंदा बदल झाला आहे. प्रभाग पाच मधील अ भाग हा अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव झाला आहे. तर ब भाग हा ओबीसी प्रवर्गासाठी राखीव आहे. क भाग हा सर्वसाधारण महिलेसाठी तर ड भाग सर्वसाधारण अर्थात सर्वांसाठी खुला झाला आहे. त्यामुळे येथे इच्छूकांची मोठी यादी समोर आली आहे. प्रभाग क्रमांक पाच ची लोकसंख्या ही २४ हजार आहे.

**प्रभाग क्र ५ व ६ मधील आर आर सी चा रणसंग्राम हा कार्यक्रम पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा**

### विकासाची दिशा सापडणे महत्त्वाचे

प्रभागाच्या विकासाची दृष्टी असलेले नगर सेवक असणे आवश्यक आहे. कारण त्या शिवाय त्या भागातील समस्या सुटू शकत नाही. कामातून तुमची ओळख निर्माण होते. जुन्या नगरसेवकांनी केलेल्या कामाचा उल्लेख आजही होतो. त्यांनी दाखवून दिलेली विकासाची वाट संबंधित प्रभागाला स्वच्छ सुंदर ठेवत असते.

### दैनंदिन समस्या सुटाव्या एवढी अपेक्षा असते

आपल्या प्रभागात नागरिकांना पाणी, वीज, स्वच्छता हवी असते. तसेच अडचणीच्या वेळी नगरसेवकाने धावून यावे अशी किमान अपेक्षा मतदार बाळगून असतात. आणि एकदा निवडणूक प्रक्रिया आटोपली की जन समस्याकडे पाठ फिरवणा-यांना धडा शिकवल्या शिवाय मतदार राहत नाही.

# आयुक्तांचा बंगला असलेल्या
# प्रभागात अनेक भाग अविकसित




प्रभाग क्रमांक ६ हा शहरातील महत्त्वाच्या परिसर मानला जातो. हॉस्पिटल्स, सर्वच व्यावसायिकांचे मोठे जाळे, हॉटेल्सचा परिसर म्हणून प्रभागाची ओळख आहे. शिवाय या प्रभागातील ७० टक्के मतदार हा सुशिक्षित आहे. देशमुख फैल, गवळीपुऱ्याचा काही भाग वगळता सूपंर्ण परिसर उच्चभ्रू वस्तीत गणला जातो. गेल्या काही वर्षात प्रभागातील रस्ते, नाल्या, सर्विस लाईनची कामे प्रामुख्याने झाली. घंटा गाडी नियमित येत असली तरी उघड्यावरील कचऱ्याची समस्या संपूर्ण प्रभागातच दिसून आली. तसेच, महत्वाचा परिसर असतानाही काही भागात दिव्यांचा मंद प्रकाश असतो. वकिल, न्यायाधीशांचे व आयुक्तांचा बंगला असलेला हा प्रभाग अतिशय महत्वाचा असाच आहे.



आरती घोगलिया | सारिका जयस्वाल | राहुल देशमुख | राजेंद्र गिरी

देशमुख फैल, माता नगर, गवळीपुरा, तापडिया नगर या भागांत कचऱ्याचे ढिगारे साचतात. नियमित उचल न झालेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरते, माशा-मच्छरांची संख्या वाढते आणि आजारांचे प्रमाण वाढण्याची भीती नागरिक व्यक्त करतात. सर्वच भागात कचरा टाकण्यासाठी महापालिकेने सुविधा करून द्यावी, अशी नागरिकांची मागणी आहे असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणले. रस्त्यांवर प्रकाश कमी असल्याने वाहतूक व सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनतो आहे.




उच्चभ्रू वस्त्यांमध्ये नाल्यांचे बांधकाम, सिमेंट रस्ते, फुटपाथ, काही ठिकाणी हरित क्षेत्रे तयार करण्यात आली आहेत. मात्र, या भागांतही पथदिव्यांच्या खाली अंधारउघड्यावरील कचऱ्याने आरोग्य धोक्यात प्रभाग क्रमांक ६ हा उच्चभ्रू वस्तीचा भाग असतानाही उघड्यावर कचरा टाकण्यात येत असल्याने स्वच्छतेची परिस्थिती गंभीर होत चालली आहे.

अनेक भागांत कचरा उचलण्यासाठी महापालिकेची घंटा गाडी नियमितपणे फिरत नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. रहिवाशांना घरगुती कचरा टाकण्यासाठी पर्याय उरत नाही आणि कचरा उघड्यावरच टाकण्याची वेळ येते. परिणामी प्रभागातील अनेक रस्ते, वळणांवर, उघड्या मैदानांवर आणि गल्ल्यांमध्ये कचऱ्याचे ढिगारे तयार झाले आहेत.

महाजनी प्लॉट, सातव चौक, गड्डम प्लॉट, रामदास पेठ, मराठा नगर, भागवत प्लॉट, दुर्गा चौक परिसर या उच्चभ्रू वस्त्यांमध्ये रस्ते, नाल्यांची दुरुस्ती, उद्यानांचा विकास अशी अनेक कामे झाली आहेत. तर देशमुख फैल, माता नगर, गवळीपुरा या भागात कचरा, पथदिव्यांचा अभाव, सखल भागात पावसाचे पाणी साचणे, सफाईची अडचण अशा मूलभूत समस्या कायम असल्याचे नागरिक सांगतात. प्रभाग सहा मधील पाणीपुरवठा हा सर्वच भागात नियमित होत असल्याचे नागरिक म्हणतात. पूर्वी काही भागांमध्ये पाच ते सात दिवसाआड पाणीपुरवठा होत असे; परंतु गेल्या काही काळात तो सुरळीत झाला आहे.

मराठा नगर, गड्डम प्लॉट, देशमुख फैल मधील काही भागात रस्त्यांची अवस्था काही ठिकाणी खराब झाली आहे. गवळीपुरा परिसरात कचरा उचलणे अनियमित असल्याने उघड्या जागांवर कचरा ढिगारे दिसतात. काही भागांमध्ये सफाई कर्मचारी नियमित येत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. प्रभागात इच्छुकांची संख्या मोठी भारतीय जनता पार्टीचे तिकिट मिळविण्यासाठी विद्यमानांसह पक्षातील इतर इच्छुकांकडून तिकिटासाठी फिल्डींग लावली जात आहे. तसेच, प्रभागाचे आरक्षण पाहता अनेकांना सोयीचे झाल्याचे चित्र आहे. या प्रभागात भाजपमध्येच इच्छुकांची यादी मोठी असल्याने तिकिटासाठी स्पर्धा तीव्र होणार आहे.

**प्रभाग क्र.६परिसर**

महाजनी प्लॉट, सातव चौक, गड्डम प्लॉट, रामदास पेठ, मराठा नगर, तापडीयानगर, देशमुख फैल, लक्ष्मी ऑईल परिसर, माता नगर, चौरे प्लॉट, भागवत प्लॉट, दुर्गा चौक, गवळीपुरा.

२०१७ मध्ये 'भाजप'चे एकहाती वर्चस्व महापालिकेच्या २०१७ साली झालेल्या निवडणुकीत प्रभाग ६ मधील चारही जागांवर भारतीय जनता पार्टीचे उमेदवार विजयी झाले होते. प्रभाग ६ मधील 'अ' गटात भाजपच्या आरती घोगलिया (मते ४५७१), 'ब' गटातून राहुल देशमुख (४५२९), 'क'मध्ये सारिका जयस्वाल (५१९०), व राजेंद्र गिरी (३५९४) 'ड'मध्ये विजयी झाले होते. चारही उमेदवारांना मोठ्या मताधिक्यांनी विजय मिळाला होता. प्रभागातील मतदानाचा कल भाजपच्या बाजूने होता, त्यामुळे हा प्रभाग भाजप मजबूत गड मानला जातो. आगामी निवडणुकीतही भाजपचे इच्छुक तिकिटासाठी अनेक महिन्यांपासून सक्रिय झाले आहेत. तर अन्य पक्षांकडूनही इच्छुकांनी हालचाली सुरू केल्या आहेत. युती-आघाडीचे समीकरण काय राहते, यावर या प्रभागातील राजकीय दिशा अवलंबून आहे. प्रभाग क्रमांक ६ अर्थात रामदास पेठ, देशमुख फाईल या प्रभागात अनुसूचित जाती महिलेसाठी अ भाग राखीव आहे. तर ब भाग हा ओबीसीसाठी आहे त्यात पुरुष महिला कोणी पण उभे राहू शकेल. तर क भाग सर्वसाधारण महिलेसाठी राखीव आहे आणि ड भाग हा सर्वसाधारण अर्थात खुला आहे.

### आयुक्त बंगल्याजवळ चकाचक, अन्यत्र घाणीचे साम्राज्य'

मुख्य रस्ते पूर्णपणे उखडले असून, जागोजागी गिट्टी बाहेर गटारी उघड्या पडल्याने सांडपाणी थेट मुख्य रस्त्यावरून वाहते, रात्री बंद राहतात पथदिवे नागरिकांना करावा लागतो अंधाराचा सामना, सुभाष चौक आणि हनुमान बस्ती परिसरात मोकाट श्वानांचा सुळसुळाट, माता नगर परिसरातील अतिक्रमण हटवल्यानंतर झाला कचरा डेपो, सार्वजनिक स्वच्छतागृहांजवळ घाणीचे डबके साचलेले असणे दुर्दैवी आहे. याकडे लक्ष द्यावे अशी मागणी सातत्याने केली जाते.




दरम्यान, काही नवे चेहरे या प्रभागातून मैदानात उतरविले जाण्याचे संकेत मिळत असल्याने तिकिट वाटपात मोठी चुरत पाहयला मिळेल. तसेच इतर पक्षांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास शिवसेना (ठाकरे), राष्ट्रवादी (अजित पवार), काँग्रेस पक्षाकडून तिकिट मिळविण्यासाठी काही जण प्रयत्न करत आहेत.




### समस्या सुटत का नाही ?

प्रभागातील समस्या सुटाव्या आणि जगणे सुसह्य व्हावे ही अपेक्षा नागरिक बाळगून असतात. परंतु वर्षानुवर्षे प्रभागातील समस्या तशाच राहत असतील तर नागरिक उद्विग्न होणारच. महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने हा विषय ऐरणीवर आला आहे.

त्यामुळे नव्या दमाच्या उमेदवारांची निवड व्हावी अशी अपेक्षा नागरिकांना आहे. इतकेच नाही तर विविध राजकीय पक्ष देखील या निवडणुकीत नविन चेहऱ्यांना संधी देण्याची शक्यता आहे. अनेक जुन्या नगर सेवकांची तिकीटे कापली जातील अशी चर्चा राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे..

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK